गणपती बाप्पा मोरया

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | सोमवार, १ सप्टेंबर २०२५ | वर्ष: १ | अंक:९० | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## आ. अर्जुन खोतकरांविरोधात गुन्हा

इंदापूर, दि. ३१ प्रतिनिधी

आमदार अर्जून खोतकर यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. कारण खाटीक समाजाबद्दल आक्षेपार्ह विधान करणे आमदार खोतकर यांच्या अंगलट आले आहे. त्यांच्या विरोधात इंदापूर तालुक्यातील भिगवण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, भिगवण पोलिसांनी हा गुन्हा पुढील तपासासाठी जालना पोलिसांकडे वर्ग केला आहे. बारामती येथील खाटीक समाजाचे कार्यकर्ते करण सुनील इंगुले यांनी याबाबतची फिर्याद भिगवण पोलिस ठाण्यात दिली आहे. त्या फिर्यादीवरून शिवसेनेचे आमदार अर्जून खोतकर यांच्या विरोधात भिगवण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आमदार अर्जून खोतकर यांनी खाटीक समाजाबद्दल आक्षेपार्ह विधान केले होते. त्यानंतर आमदार खोतकर यांच्या विरोधात खाटीक समाजाच्या वतीने बारामतीसह राज्यभरात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आले होते. करण इंगुले यांनी 'अर्जून खोतकर यांच्या विरोधात जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेतला होता.

### अग्राग्रलेख
### खरीखरी

## चीन विश्वसनीय आहे काय?


**सध्या आपल्या भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी चीनच्या दौऱ्यावर आहेत. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी आपल्या सोबत उभा दावा मांडल्याने त्याला प्रत्युत्तर म्हणून आपल्याला चीन आणि रशिया यांच्याबरोबर मैत्रीचे संबंध जोपासणे गरजेचे आहे. कारण ज्या ज्या गोष्टींची अमेरिकेला गरज आहे. त्याची निर्यात अमेरिका करतो. त्या त्या वस्तू अमेरिका इतर देशाकडूनही खरेदी करू शकतो. मात्र ज्या वस्तू केवळ चीनच पुरवू शकतो. तिथे मात्र अमेरिकेचे घोडे अडलेले आहे, त्यामुळेच सद्यस्थितीमध्ये चीन सोबत खाजवणे परवडणार नाही. म्हणूनच अमेरिकेने चीनबाबत मवाळ धोरण स्वीकारलेले आहे. आता आपल्याला रशिया बरोबरचे संबंध पुन्हा वाढवावे लागतील. येत्या दहा-अकरा वर्षात आपली अमेरिका दोस्ती आपल्या जुना मित्र असलेल्या रशियाला फारशी मानवली नव्हती. पण तरीही युक्रेन सारख्या युद्धानंतरही अमेरिकेचा दबाव येऊनही आपली मैत्री जी रशिया सोबत होती ती आपण तोडलेली नाही. पूर्वीच्या काळी सर्वच देशांबरोबर आपले चांगले संबंध होते. जगातील सर्वात प्रथम अलिप्ततावादी चळवळीचा म्होरक्या भारतच होता. नासेर, टिटो आणि नेहरू हे त्याच चळवळीचे नेते होते. तरीही अमेरिकेबरोबरचे संबंध कधीच इतके बिघडले नव्हते. ट्रम्प सारख्या लहरी लालाच्या इच्छेनंतर सध्या जे जे सुरू आहे तो एका प्रकारे खूनशीपणा सारखाच प्रकार आहे. त्याला अमेरिकेच्या न्यायालयानेच बेकायदा ठरवलेले आहे. खुद्द अमेरिकेतील न्यायालयाने ज्या गोष्टी बेकायदा ठरविलेल्या आहेत. त्यावर हा लहरी मोहम्मद ट्रम्प जबरदस्त टीका करीत आहे. म्हणजेच ट्रम्पला न्यायालयाची भीती नाही. तो ही स्वतःच्या देशातील न्यायालयाला मानत नाही हेच यावरून सिद्ध होते. आता आपले पंतप्रधान चीन दौऱ्यावर आहेत. भारत आणि चीन जवळपास अगदी स्वतंत्रपणे एकमेकांसोबत मैत्री करत होते. त्यावेळी 'हिंदी चिनी भाई भाई' या घोषणा देऊन झाल्या, त्यानंतर पंचशीलचा उदो उदो केला गेला. ते सगळे झाल्यावर चीनने १९६२ साली त्या मैत्रीला हरताळ फासून भारतावर जबरदस्त हल्ला केला आणि भारताची बरीच मोठी जमीन बळकावली. आताही चीनने लडाख भागात आणि अरुणाचल प्रदेशामध्ये आपली मोठ्या प्रमाणात जमीन बळकावलेली आहे. पण आपल्यालाही चीनशी मैत्री करणे आजच्या परिस्थितीत गरजेचे आहे. पंतप्रधान मोदी आणि त्यांचे शिष्टमंडळ यातून कसा मार्ग काढतात यावर चीनची मैत्री अवलंबून आहे. आजपर्यंत ज्या ज्या लोकांनी चीनवर विश्वास ठेवला. त्यांचा विश्वासघात चीनने केला आहे. कोणालाही हा अनुभव कधीच सुखद ठरला नाही. प्राप्त परिस्थितीमध्ये जे काही समोर वाढलेले आहे, त्या परिस्थितीमध्ये भारताला चीनवर भरवसा ठेवणे हाच एक मार्ग उरला आहे. आपण त्यांच्या चांगल्या परिणामांची आशा करूया. तरीही आमचा प्रश्न हाच आहे की चीन विश्वसनीय आहे काय?**

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# आजपासून पाणीही बंद; जरांगेंचा इशारा

मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी

**मराठा समाजाला आरक्षण दिलं नसल्याने प्रचंड मोठी वेदना आहे. मुंबईत मराठा बांधवांची केवळ गर्दी झाली आहे, असे सरकारने समजू नये, तर वेदना समजावी. उद्यापासून मी पाणीही बंद करणार आहे. आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असा इशारा मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज राज्य सरकारला दिला. ते आझाद मैदानावर पत्रकार परिषदेत बोलत होते. मराठा मोर्चा आणि आर क्षणाबाबत सर्व गोष्टींची उत्तरे एकनाथ शिंदेच देऊ शकतील. मनोज जरांगे परत का आले याचेही उत्तर एकनाथ शिंदेंना विचारा, अशा शब्दात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला होता. यावर बोलताना जरांगे म्हणाले की, "दोघे ठाकरे भाऊ चांगले आहेत, त्यांचा ठाकरे ब्रँड चांगला आहे, असे समाजाचे म्हणणे आहे.**



पण राज ठाकरे विनाकारण मराठ्यांच्या प्रश्नात पडतात. त्यांना आम्ही कधीही विचारलेले नाही. तुमचे १३ आमदार निवडून दिले होते. ते पळून गेले. तरी तुम्ही मराठवाड्यामध्ये कधी आलात का? असा प्रश्न मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केला. "तुम्ही ५० वेळा नाशिकला का येतात? हे विचारले का? लोकसभेला फडणवीसांनी तुमचा गेम केला. त्यानंतर विधानसभेला तुमचा मुलगा पाडला. तरी तुम्ही त्यांचीच तळी उचलता. फडणवीस तुमच्या घरी चहा पिऊन गेले तर तुमचा पक्ष बरबाद झाला तरी चालतो", अशी टीका जरांगे पाटील यांनी केली.

**चंद्रकांत पाटलांनी शांत राहावे, शिव्या खाऊ नका**

"चंद्रकांत पाटील यांनी मुलांसाठी चांगल काम केलं म्हणून त्यांच्यावर बोलायच कमी केलं होतं. उपसमितीचे अध्यक्ष असताना मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यावरून त्यांनी वैधता थांबवली होती, हे आम्हाला माहिती आहे. त्यांनी यापुढे शांत राहवं, मराठ्यांच्या शिव्या खाऊ नका," असा इशारा जरांगे यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांना दिला.

**आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही**

"सरकार मागण्यांची अंमलबजावणी करत नाही, त्यामुळे उद्यापासून पाणी बंद करणार. सरकार कितीही अन्याय करूदे मराठा समजाने शांत रहावे, दगडफेक करू नका, तुम्हाला आरक्षण मिळवून दिल्याशिवाय मुंबई सोडणार नाही," असे आवाहन जरांगे यांनी आंदोलकांना केले.

## आंदोलनाच्या नावाने पैसे मागणाऱ्या सहकाऱ्यावर मनोज जरांगे संतापले

मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी

आझाद मैदानावर सुरू असलेल्या या आंदोलनात भर पावसात अज्ञात व्यक्तीने हजारो रेनकोट मराठा आंदोलकांसाठी वाटल्याच्या काही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

रेनकोट वाटणाऱ्या व्यक्तीचे आंदोलकांकडून आभार मानल्याच्याही पोस्ट व्हायरल होत आहेत. सध्या सोशल मीडियावर यासंदर्भात मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. दरम्यान, यावर आता मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया देत आंदोलनाच्या नावाने पैसे गोळा करण्यात येत असल्याचा आरोप करत पैसे खाणाऱ्या सहकाऱ्यावर मनोज जरांगे हे चांगलेच संतापले आहेत. तसेच अशा प्रकारे रेनकोटच्या नावाखाली किंवा अन्नछत्राच्या नावाखाली कोणीही पैसे मागत असेल तर पैसे न देण्याचे आवाहन मनोज जरांगे यांनी मराठा आंदोलकांना केलं आहे.

"आंदोलनाच्या ठिकाणी जे अन्नछत्र सुरु केले आहेत ते महाराष्ट्रातील लोकांनी आणि काही मुंबईतील लोकांनी केले आहेत. हे आंदोलकांनी समजून घ्या. अन्नछत्र जे सुरू केले आहेत ते एकएका व्यक्तीने सुरू केलेले आहेत. पण त्याच्या नावाखाली कोणीही पैसे कमवू नका. अन्यथा मी मीडियात त्या व्यक्तीचं नाव घेईन. परत म्हणू नका हे काय झालं. अन्नछत्र एकाने सुरू केलंय आणि पैसे दुसरा गोळा करतोय. अशा पद्धतीने गरीबांचं रक्त पिण्याचं काम बंद करा. मी स्पष्ट सांगतो त्या व्यक्तीचं नाव घेईन, तो माझ्या कितीही जवळचा असला तरीही मी त्याचं नाव घेईन", असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

"तुम्ही माझ्यासाठी गाडी घेऊन पळता म्हणून तुम्ही पैसे जमा करू शकत नाहीत. तुझ्या गाडीचे आतापर्यंत किती पैसे झाले ते आम्ही सर्व मराठा वर्गणी करून देतो. मी कोणाला बोलतो हे त्या व्यक्तीला कळत असेल. कारण त्या व्यक्तीने लोकसभेत देखील पैसे खाल्ले हे मलाही माहिती आहे. आताही रेनकोटच्या नावाखाली पैसे गोळा करत असेल तर मला हे जमणार नाही. रेनकोट एका व्यक्तीने वाटलेत. मला या ठिकाणी रेनकोट वाटप करायचे असं म्हणून लोकांकडून पैसे जमा केले जात आहेत. मात्र, असे भिकार धंदे बंद कर. तुझी माझ्या नजरेत प्रतिष्ठा आहे. मी स्पष्ट सांगतोय अन्यथा मी पुराव्यासह नाव जाहीर करेन", असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

## केवळ खूष करण्यासाठी निर्णय घेतला तर तो एक दिवसही टिकणार नाही-मुख्यमंत्री

मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी

सरकारला कायद्याच्या चौकटीत राहून निर्णय घ्यावे लागतील. ते करताना सामाजिक वीणही पहावी लागेल. न्यायालयाच्या आधीच्या निर्णयांचाही सकल विचार करावा लागेल. या संदर्भात कायद्याच्या चौकटीच्या बाहेर जाऊन असेच निर्णय करा असे कोणी म्हणत असेल, आणि सरकारने खूष करण्यासाठी असा निर्णय घेतला तर तो एक दिवसही टिकणार नाही असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. कायद्याच्या चौकटीत राहून निर्णय घ्यावे लागतील. ते करताना सामाजिक वीणही पहावी लागेल. न्यायालयाच्या आधीच्या निर्णयांचाही सकल विचार करावा लागेल. या संदर्भात कायद्याच्या चौकटीच्या बाहेर जाउन असेच निर्णय करा असे कोणी म्हणत असेल, आणि सरकारने खूष करण्यासाठी निर्णय घेतला तर तो एकही दिवस टिकणार नाही. मराठा समाजाची फसवणूक झाल्याची भावना तयार होईल. म्हणून आम्ही चर्चा करत आहोत. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीत विचारविनिमय सुरू आहे. ॲडव्होकेट जनरलचेही मत घेण्यात येईल. कायदेशीर सल्लागारांचे मत घेत आहेत. यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू. चर्चेतून लोकशाहीत तोडगा निघतो,आडमुठ्या भूमिकेने तोडगा निघत नाही असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## 10 वर्ष ते केंद्रामध्ये मंत्री होते तेव्हा त्यांना लक्षात नाही आले
### विखे पाटलांची शरद पवारांवर टीका

मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी पुन्हा एकदा मराठा समाजाने मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत आंदोलनाला सुरुवात केली आहे. मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन केले जात असून राज्य सरकारकडून यावर उपाय काढण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यादरम्यान मराठा समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी नेमण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची आज बैठक झाली. या बैठकीनंतर या समितीचे अध्यक्ष जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीत झालेल्या चर्चेबद्दल माहिती दिली. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी मराठा आरक्षणाबाबत मांडलेल्या भूमिकेवर देखील जोरदार टीका केली.



शरद पवारांनी मराठा आरक्षणासाठी घटनेत दुरूस्ती करण्याबाबत केलेल्या विधानावर बोलताना विखे पाटील म्हणाले की, मला शरद पवारांचे नेहमी आश्चर्य वाटतं की, ते राज्याचे चार वेळा मुख्यमंत्री होते. १९९४ साली मंडल आयोगाची अंमलबजावणी करताना त्यांच्या का लक्षात आलं नाही की त्यावेळी आपण मराठा समाजाचा अंतर्भाव करावा म्हणून...१० वर्ष ते केंद्रामध्ये मंत्री होते केंद्रामध्ये आणि राज्यामध्ये यूपीएचं सरकार होतं. १० वर्षात त्यांना लक्षात आलं नाही का की घटनेत बदल करून हे (मराठा आरक्षण) देऊ शकतो. मराठा समाजाती मागणी आजची नाही, ती जुनीच मागणी आहे. आपल्या स्वतःकडे जबाबदारी होती तेव्हा ती पूर्ण केली नाही, आज या प्रश्नावर ते आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न ते करत आहेत. त्यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याकडून हे अपेक्षित नाही.

सरसकट ओबीसीमधून आरक्षण देणं शक्य आहे का? यावर बोलताना विखे पाटील म्हणाले की, यावर शरद पवारांनी, त्यांच्या नेत्यांनी सांगावं की मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देता येईल अशी भूमिका त्यांनी जाहीर करावी. यावर ते काही बोलत नाहीत. मग घटना दुरुस्ती करता येईल हे ज्ञान त्यांनी आम्हाला देऊ नये, असे विखे म्हणाले.

आरक्षणाच्या प्रश्नात केंद्र सरकार व संसदेची भूमिका महत्त्वाची आहे, राज्यघटनेत दुरुस्ती केल्याशिवाय हा प्रश्न मार्गी लागणार नाही, यासाठी केंद्र सरकारची भूमिका महत्वाची आहे. दोन्ही समाजात कटुता वाढणार नाही, यासाठी धोरणात्मक भूमिका घेऊन जनमत तयार करावे लागणार असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासदार शरद पवार शनिवारी नगरमध्ये बोलताना व्यक्त केले होते.

दरम्यान, निवृत्त न्या. शिंदे आणि आधिकारी जरांगे पाटील यांना भेटले आणि शासनाच्या वतीने आपण काय कारवाई करतोय याची त्यांना माहिती दिली. त्यानंतर त्यांनी मांडलेल्या काही मुद्द्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची आज बैठक झाली. त्यांच्या मागण्याबाबत आज पुन्हा चर्चा झाली. हैदराबाद आणि सातारा गॅझेटची अंमलबजावणी लगेचच झाली पाहिजे आणि त्यासाठी आम्ही मुदतवाढ देणार नाही अशी भूमिका जरांगे यांना मांडली आहे. याबाबत काही त्रुटी आहेत, ज्याबद्दलच्या कायदेशीर बाबी आम्ही तपासून घेत आहोत. अमलबजावणीबाबत काय होतंय याबाबत आम्ही त्यांच्याबरोबर चर्चा करणार आहोत, असे विखे पाटील यांनी यावेळी सांगितले. तसेच आज संध्याकाळी ॲडव्होकेट जनरल यांच्याशी चर्चा होणार आहे. त्यानंतर गरज वाटली तर पुन्हा समितीची बैठक होईल आणि त्यानंतर अंतिम प्रस्ताव जरांगे पाटील यांना दिला जाईल असे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

## भुजबळांनी बोलावली ओबीसी नेत्यांची बैठक

मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानात आमरण उपोषण सुरू केले आहे. आज त्यांच्या उपोषणाचा तिसरा दिवस असून, "आरक्षण मिळेपर्यंत उठणार नाही," अशी ठाम भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. यामुळे एकीकडे सरकारवर दबाव वाढताना दिसत आहे. तर मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीचा ओबीसी समाजातून विरोध केला जात आहे. आता राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तसेच ओबीसी नेते छगन भुजबळ'ॲक्शन मोड'वर आल्याचे पाहायला मिळत आहे.



मराठा आरक्षणावरून वाढत्या हालचालींचा ओघ पाहता, मंत्री छगन भुजबळ यांनी राज्यातील सर्व ओबीसी नेत्यांची उद्या मुंबईत तातडीची बैठक बोलावली आहे. ओबीसी आरक्षणाचे संभाव्य परिणाम आणि मराठा आरक्षणावर ओबीसी समाजाची भूमिका याबाबत या बैठकीत सखोल चर्चा होणार असल्याची माहिती मिळत आहे. बैठकीनंतर ओबीसी समाजातील प्रमुख नेत्यांची एकत्रित पत्रकार परिषद आयोजित करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेत ओबीसी समाजाची अधिकृत भूमिका जाहीर होणार असून, विशेषतः हैदराबाद गॅझेट, सातारा आणि औंध गॅझेट यासंदर्भात हाय कोर्ट व सुप्रीम कोर्टाच्या आदेशांचा संदर्भ देत काही महत्त्वाचे मुद्दे मांडले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे या पत्रकार परिषद महत्त्वाची मानली जात आहे. या पत्रकार परिषदेतून मंत्री छगन भुजबळ नेमके कोणते मुद्दे उपस्थित करणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## अभिनेत्री प्रिया मराठेचे निधन

मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी




'पवित्र रिश्ता', 'तुझेचं गीत मी गात आहे', 'तू तिथे मी', यासारख्या मराठी आणि हिंदी मालिकांमधून अभिनयाची अमीट छाप उमटवणाऱ्या अभिनेत्री प्रिया मराठेचं रविवारी निधन झाले. वयाच्या ३८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या दोन वर्षांची कर्करोगाशी झुंज अखेर संपली. त्यांच्या जाण्याने मराठी सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे. ती एक उत्तम बॅडमिंटनपटू होती.

प्रिया मराठे यांनी अनेक मालिकेतील आपल्या अभिनयाने लोकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण केलं होतं. 'तुझेच मी गीत गात आहे' ही मालिका आरोग्याच्या कारणास्तव तिने मध्येच सोडली होती. प्रिया मराठेचा जन्म ठाणे येथे २३ एप्रिल १९८७ रोजी झाला होता. २००६ मध्ये आलेल्या 'या सुखांनो या' या मराठी मालिकेत तिने भूमिका करून आपल्या अभिनयास सुरुवात केली. सर्वाधिक गाजलेली हिंदी मालिका 'पवित्र रिश्ता' मध्ये तिने भूमिका साकारली होती.

'कसम से', 'पवित्र रिश्ता', 'बडे अच्छे लगते है', 'चार दिवस सासूचे', 'तू तिथे मी', 'कॉमेडी सर्कस' या हिंदी आणि मराठी मालिकांमध्ये तिने काम केले. 'तू तिथे मी' या मालिकेतील त्यांचा अभिनय लोकांच्या मनात घर करून गेला. मराठी छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मालिका 'चार दिवस सासूचे' यात प्रियाची प्रमुख भूमिका होती. मराठी चित्रपट 'विघ्नहर्ता महागणपती' (२०१६) आणि 'किरण कुलकर्णी व्हर्सेस किरण कुलकर्णी' (२०१६) मध्येपण तिने काम केले.

## सुप्रिया सुळेंच्या गाडीला मराठा आंदोलकांचा घेराव

मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी



मराठा समाजाला आरक्षण मिळावं, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलनाला सुरुवात केली आहे. मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण आंदोलन सुरू आहे. आज आंदोलनाचा तिसरा दिवस आहे. या आंदोलनामध्ये महाराष्ट्रातील लाखो मराठा आंदोलक सहभागी झालेले आहेत. आझाद मैदानावर सुरू असलेल्या या आंदोलनाला अनेक राजकीय नेते भेटी देत आहेत.

आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आंदोलनाला भेट देत मनोज जरांगे पाटील यांच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच भेटीनंतर सुप्रिया सुळे पुन्हा परत जात असताना त्यांची गाडी आंदोलकांनी आडवली. यावेळी सुप्रिया सुळे यांच्या गाडीला आंदोलकांनी घेराव घालत गाडी पुढे जाऊ देण्यास नकार दिला आणि शरद पवारांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. 'शरद पवारांनी मराठ्यांचं वाटोळं केलं', 'एक मराठा, लाख मराठा..' अशा आशयाच्या घोषणा आंदोलकांनी दिल्या.

दरम्यान, त्यानंतर सुरक्षा रक्षकांनी सुप्रिया सुळे यांच्या गाडीला रस्ता करून दिला आणि सुप्रिया सुळे या त्या ठिकाणाहून रवाना झाल्या. मात्र, यावेळी काही आंदोलकांनी पाण्याची बाटलीही फिरकवण्याचा प्रयत्न केल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, यामुळे मुंबईतील आझाद मैदानावर मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण झाल्यामुळे काहीवेळ मोठा तणाव निर्माण झाल्याचं पाहायला मिळाले.

## मरीन ड्राईव्हवर मराठा आंदोलक समुद्रकिनारी खडकांवर उतरले

मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी



रविवारी मरीन ड्राईव्ह परिसरात मराठा आंदोलकांची मोठी गर्दी दिसून आली. मरीन ड्राईव्ह येथील नेकलेस परिसरात शेकडोंच्या संख्येने मराठा तरूण भ्रमंतीसाठी आले होते. मात्र काही मराठा तरूण खडकांवर जाऊन फोटो काढत होते. याठिकाणी असलेल्या पोलिसांनी आंदोलकांना सूचना देत तिथून बाहेर येण्याची विनंती केली. या प्रकारामुळे मराठा आंदोलक स्वत:चा जीव धोक्यात घालत असल्याचे सांगत पोलिसांनी त्यांना बाहेर येण्याची सूचना केली. त्याशिवाय मराठा आंदोलकांना जेवण मिळावे यासाठी याठिकाणीही टेम्पो फुटपाथवरून नेताना दिसून आला.

## जायकवाडीतून तिसऱ्यांदा पाणी सोडले
### गोदावरी नदीकाठाच्या गावांना सावधानतेचा इशारा

बोधेगाव, दि. ३१ प्रतिनिधी

मराठवाड्यासह नगर जिल्ह्यातील शेवगाव, नेवासा तालुक्याला वरदान ठरलेल्या जायकवाडी जलाशयात गुरुवारी रात्री १०२.१८४६ टीएमसी म्हणजे ९९.४८ टक्के पाणीसाठा झाला. उपयुक्त पाणीसाठा ७६ हजार ११८४ टीएमसी म्हणजे ९९.२८ टक्क्यांपर्यंत जाऊन पोहोचल्याने धरण प्रशासनाने जायकवाडीतून गोदावरी नदी पात्रात तिसऱ्यांदा पाण्याचा विसर्ग सोडण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार शुक्रवारी सकाळी साडेआठच्या सुमारास जलाशयाच्या दरवाजा क्रमांक १० ते २७ असे एकूण १८ दरवाजांमधून चार फुटापर्यंत उघडून ७५ हजार ४५६ क्यूसेकने पाण्याचा विसर्ग सुरू केल्याची माहिती धरण प्रशासनाकडून सांगण्यात आली.

सध्या जायकवाडी सागर जलाशयात नांदूर मधमेश्वर प्रकल्पातून १२ हजार ६२० क्यूसेसने पाण्याची आवक सुरू आहे. नाशिक, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, घोटी या परिसरात सध्या जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे जलाशयात पाण्याची आवक जोरदार होत आहे.

गेल्या २४ तासांत जलाशयात ४.८२८९ क्यूसेक नवीन पाण्याची आवक झाली असून यंदाच्या पावसाळ्यात आत्तापर्यंत ८०.२११० क्यूसेक नवीन पाणी दाखल झाले असून, शुक्रवारी सकाळी जलाशयाचा एकूण पाणीसाठा ९९.४७ टक्क्यांपर्यंत जाऊन पोहोचल्याने धरण प्रशासनाने जलाशयातून गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू करण्याचा निर्णय घेतला.

## संबंध पुढे नेण्यासाठी वचनबद्ध, सीमेवर शांतता
### मोदी आणि जिनपिंग यांच्यात बैठक

शांघाय, दि. ३१ वृत्तसंस्था

भारत आणि अमेरिकेमधील संबंधांमध्ये टॅरिफच्या मुद्यावरून काहीसा तणाव निर्माण झाला असतानाच दुसरीकडे चीन-आणि भारतामधील संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचं दिसून येत आहे. तब्बल ७ वर्षांनंतर पंतप्रधान मोदी चीनच्या दौऱ्यावर आहेत. पंतप्रधान मोदी हे सध्या तिआंजिनमध्ये दाखल झाले असून ते शांघाय सहकार्य संघटनेच्या परिषदेत सहभागी झाले आहेत. या दरम्यान पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात एक महत्वाची बैठक झाली आहे.



पंतप्रधान मोदी आणि शी जिनपिंग यांच्यातील बैठकीत द्विपक्षीय संबंधाबाबत चर्चा पार पडली आहे. शी जिनपिंग आणि मोदी यांच्या या बैठकीकडे अवघ्या जगाचं लक्ष लागलं होतं. एससीओ शिखर परिषदेत मोदी सहभागी झाल्याबद्दल शी जिनपिंग यांनी मोदींचे आभार मानले आहेत. दरम्यान, परस्पर विश्वास, आदर आणि संवेदनशीलतेच्या आधारावर दोन्ही देशातील संबंध पुढे नेण्यासाठी वचनबद्ध असल्याचं मोदींनी या बैठकीत स्पष्ट केलं आहे.

परस्पर विश्वास, आदर आणि संवेदनशीलतेवर आधारित संबंध पुढे नेण्यासाठी वचनबद्ध असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी शी जिनपिंग यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत म्हटलं आहे. मोदी म्हणाले की, "चीनला भेट देण्याचं निमंत्रण दिल्याबद्दल आणि आजच्या आमच्या बैठकीसाठी मी तुमचे आभार मानतो. सीमा व्यवस्थापनाबाबत आमच्या विशेष प्रतिनिधींमध्ये एक करार झाला आहे. कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू झाली आहे. दोन्ही देशांमधील थेट उड्डाणे देखील पुन्हा सुरू होत आहेत", असं मोदींनी म्हटलं.

"दोन्ही देशांच्या २.८ अब्ज लोकांचे हित आमच्या सहकार्याशी जोडलेले आहे. यामुळे संपूर्ण मानवतेच्या कल्याणाचा मार्गही मोकळा होईल. परस्पर विश्वास, आदर आणि संवेदनशीलतेच्या आधारावर आमचे संबंध पुढे नेण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. गेल्या वर्षी कझानमध्ये आमच्यात खूप यशस्वी चर्चा झाली होती. ज्यामुळे आमच्या संबंधांना सकारात्मक दिशा मिळाली. सीमेवरून सैन्य मागे घेतल्यानंतर शांतता आणि स्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे", असंही पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे.

"चीन आणि भारत ही दोन प्राचीन संस्कृती असलेले देश आहेत. जग एका मोठ्या बदलाकडे वाटचाल करत आहे. आपण जगातील दोन सर्वाधिक लोकसंख्या असलेले देश आहोत. आपल्या दोन्ही देश कल्याण व जीवन सुधारण्याची तथा विकसनशील देशांची एकता आणि पुनरुज्जीवन वाढवण्याची आणि मानवी समाजाच्या प्रगतीला चालना देण्याची जबाबदारी आपण घेतो. चांगले शेजारी आणि मैत्रीपूर्ण संबंध असलेले मित्र असणे, एकमेकांच्या यशाला सक्षम करणारे चांगले शेजारी असणे आणि ड्रॅगन व हत्ती एकत्र येणे हे खूप महत्वाचे आहे", असं शी जिनपिंग यांनी म्हटलं आहे.

# मनुदेवी ते दहावा मैल परिसरातील महामार्ग ठरतोय अपघात मार्ग

## राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या दुर्लक्षाचा परिणाम



**ओझर ।** ओझर येथील जनशांती धाम चौक (दहावा मैल) येथे नाशिकहून ओझरला जाणाऱ्या रस्त्याची डागडुजी करण्यात आली. मात्र, ओझरहून नाशिककडे जाणाऱ्या रस्त्याची डागडुजी करण्यात संबंधित यंत्रणेला विसर पडल्याचे चित्र आहे. शिवाय, महामार्गावरील अनेक ठिकाणी अपूर्ण कामांच्या ठिकाणी सपाटीकरण नसल्याने वाहने आदळून अपघात होत असताना महामार्ग प्राधिकरण नेमके काय करीत आहे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

एकूणच येथील महामार्ग परिसर वाहनचालकांसाठी अपघात मार्ग ठरत आहे. माता मनुदेवी मंदिर ते जनशंती धाम चौक (दहावा मैल) या परिसरातील राष्ट्रीय महामार्ग सध्या अक्षरशः अपघातांचे केंद्र ठरत आहे. रस्त्यावरील उखडलेले डांबर, अपूर्ण कामे, सपाटीकरणाचा अभाव आणि दोन्ही बाजूंना झालेली दुरवस्था यामुळे वाहनचालकांचा जीव धोक्यात आला आहे. ओझरकडून नाशिककडे जाणाऱ्या मार्गाची डागडुजी पूर्णपणे दुर्लक्षित झाली असून, उलट नाशिकहून ओझरकडे जाणाऱ्या रस्त्यावर केवळ वरवरची डागडुजी करून जबाबदारी संपवल्याचे चित्र आहे. या अर्धवट कामामुळे वाहनांची धडक, दुचाकीस्वारांची पडझड, तसेच मालवाहतूक वाहनांचे अपघात नित्याचे झाले आहेत. वाहनचालक आणि प्रवासी यांचा संताप उफाळून आला आहे. “दररोज या ठिकाणी अपघात होताना दिसत आहे. वाहन रस्त्याला आदळले की चालकाचा तोल जातो आणि मागून येणारे वाहन गाडीवर आदळते. हे पाहूनही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण गाढ कुंभकर्णी झोपेत आहे का?” असा संतप्त प्रश्न प्रवाशांनी उपस्थित केला आहे.

### अजून किती जणांचा जीव घेणार ?

“महामार्ग प्राधिकरणाकडे वारंवार तक्रारी करूनही काहीच हालचाल होत नसल्याने त्यांच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. रस्त्यांवर जीव धोक्यात घालून प्रवास करणे भाग पडत असल्याने, तातडीने पावले उचलली नाहीत तर येणाऱ्या काळात मोठी दुर्घटना घडू शकते.

– **हरिश्चंद्र पवार, स्थानिक रहिवासी**

### धोक्याचा इशारा देणारे फलक नाही

गंभीर बाब म्हणजे अपूर्ण कामे जिथे केली आहेत तिथे धोक्याचा इशारा करणारे फलकसुद्धा नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी हा रस्ता अक्षरशः ‘डेथ ट्रॅप’ ठरत आहे. या दुर्लक्षामुळे निरपराध प्रवाशांचा जीव धोक्यात घालणे हा गुन्हा नव्हे तर काय आहे, असा सवाल संतप्त प्रवाशांकडून केला जात आहे.

### जन आंदोलनाचा इशारा

स्थानिक ग्रामस्थांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या परिस्थितीविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. येथे रोजच अपघात मालिका होत आहेत, संबंधित विभागाकडून तातडीने उपाययोजना होत नाही. प्रशासन केवळ कागदोपत्री योजना दाखवत आहे. हा मार्ग तातडीने दुरुस्त झाला नाही, तर मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभारावे लागेल,” असा इशारा देण्यात आला आहे.

# गोदावरी शिक्षण मंडळाचा २५ वा वर्धापन दिन उत्साहात



**नाशिक ।** येथील जी. डी. सावंत वरिष्ठ महाविद्यालय श्री सिद्धिविनायक कनिष्ठ व एशियन फार्मसी इन्स्टिट्यूट पाथर्डी फाटा येथील गोदावरी शिक्षण मंडळाचा २५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव अशोक सावंत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संभाजी निकम विभागीय सहनिबंधक को-ऑपरेटिव्ह सोसायटी, नितीन भामरे, क्रांती वाघ, विकास सावंत, मिनाक्षी सावंत, रंजनाताई चौरे (संचालिका, गोदावरी शिक्षण मंडळ) प्रमुख यांनी आपल्या मनोगतामध्ये गोदावरी शिक्षण मंडळ हे पूर्वी एक छोटे रोपटे होते आणि आज त्याचे वटवृक्षात रूपांतर झाले, असे संभाजी निकम यांनी सांगितले. प्रा. दर्शन पाटील यांनी ढोल ताशाच्या गजरात विद्यार्थ्यांसह प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. संस्थेचे संचालक डब्ल्यू. एन. भेंडे, एशियन फार्मसी इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. कमलेश दंडगव्हाळ, वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या दीपिका भोईटे व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विभाग प्रमुख एन. आर. शिंदे, संस्थेचे उपप्राचार्य डॉ. यू. बी. पवार, प्रा. तुषार पवार, प्रा. विपुल सोनगिरे, प्रा.अमृता पंडित, प्रा. एच. पी. देवरे, प्रा.मोनाली नागरे, प्रा.रोशनी कौर, प्रा.नीलम गांगुर्डे, प्रा.एच.डी जोंधळे, प्रा.घोटेकर, प्रा. कल्पना भोसले, प्रा.देवयानी बोरसे, प्रा.चैताली नवले, प्रा.किशोरी रौंदळ ,प्रा.दिपाली मांडवडे, प्रा.सुलोचना देशमुख, प्रा.मोनिका शेळके, प्रा. कांचन सूर्यवंशी, प्रा.साक्षी जगताप, एशियन फार्मसी इन्स्टिट्यूटच्या प्रा. भाग्यश्री कारले, प्रा.वैष्णवी वाघ, प्रा.पूनम मालोदे, प्रा.शिवानी पाटील, प्रा.ऋतुजा चव्हाण, प्रा.आशिष जाधव, प्रा.आयुष मोरनकर, प्रा.अमोल आंबेकर, प्रा.स्नेहा धामणे, प्रा.गौरी कापरे, प्रा.अंकिता चौधरी, प्रा.सिमरन रवाले, प्रा.शौनक मांडे, प्रा.प्रणाली पाटील, प्रा.शरयू गायकवाड, प्रा. गौरीजा वाणी, प्रा. दर्शना बोरसे, प्रा. योगिता सांगळे, प्रा. माधुरी ठाकरे, प्रा. अस्मिता राऊत, प्रा. गायत्री नवाटे, प्रा. नेहा सानप, मुकुंद शुक्ला, नितीन गवळी, स्नेहा अहिरे, पूजा खैरनार, कविता गोडसे, मंगला धोंगडे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.लिषा वाधवा यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.स्नेहा धामणे यांनी केले.

यावेळी अकरावी आणि बारावी विशेष प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला त्यातील मयूर संचेती, तेजस अनिल तपासे, अपेक्षा रोहिदास राक्षे, जानवी योगेश कांबळे, वैष्णवी राजेंद्र धात्रक, भूमिका मदन पाटील, वाचन स्पर्धा नंदिनी गोलाटी, आर्या युके, गायन स्पर्धा ग्रुप वक्तृत्व स्पर्धा अश्विनी गौतम निकम, आर्या युके, निबंध स्पर्धा योगेश लक्ष्मण धंदले, निशांत विलास बोडके, पोस्टर कॉम्पिटिशन, श्रुती गोरे ,सई ससाने निशांत बोडके, रांगोळी स्पर्धेत अक्षदा दिलीप सोनवणे, अश्विनी गौतम निकम, यांनी पारितोषिक मिळविले त्याचबरोबर संस्थेतील अमृता पंडित, माधवी थापेकर, माणिक लकडे, देवयानी बोरसे, प्रांजल पाटील या कर्मचाऱ्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# कविता ही माणसं जोडणारी चळवळ : उगलमुगले



**नाशिक ।** साहित्याच्या अंगणातील सर्वात सुंदर फुल कोणते असेल तर ते असते कविता ! ती चांगली किंवा वाईट नसते. जसं बागेतील प्रत्येक फुल हे पाहणाऱ्याला सुंदरच दिसतं तशी कविता असते. आपण फक्त तिचा आस्वाद घ्यायचा. कवितेला बक्षीस मिळालं म्हणजे कविता चांगली असं होत नाही. कारण बक्षीस हे काही कोणत्याही साहित्यकृतीचं मोजमाप नाही आणि कविता तर नाहीच नाही. कारण 'कविता ही माणसं जोडणारी चळवळ आहे' असंच मला कायम वाटतं असे विचार ज्येष्ठ साहित्यिक, कवी विवेक उगलमुगले यांनी व्यक्त केले. ते भगवान परशुराम संकुल,राजमाता जिजाऊ क्रीडा नगरी,छात्रवीर छत्रपती संभाजी चौक,शिवनगर चौफुली,तारवाला नगर,दिंडोरी रोड ,पंचवटी नाशिक या ठिकाणी पंचवटी ललित कला मंडळाने आयोजित केलेल्या खुल्या कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. उगलमुगले पुढे म्हणाले की, कवींनी खूप वाचले पाहिजे. जे वाचले त्यावर चिंतन केले पाहिजे. एखाद्या कवीने त्याचा अनुभव त्याच्या कवितेत कसा मांडला आहे त्यावरून आपला अनुभव आपण आपल्या कवितेत कसा गुंफू यासाठी प्रयत्न करायला हवा. शिवाय कविता सादरीकरण हे ही एक महत्त्वाचे अंग आहे त्याचाही सराव करायला हवा. बऱ्याचदा कविता आशयसंपन्न असूनही सादरीकरणा अभावी ती वाचकांपर्यंत नीट पोहचत नाही. कविता छोटी किंवा मोठी नसते तर ती आशयाने किती समृद्ध आहे हे महत्त्वाचे.

संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध कवी रवींद्र मालुंजकर, नाशिक कवी संस्थेचे कवी सुभाष सबणीस, साहित्यकणा फाउंडेशनचे सचिव विलास पंचभाई, पलकम चे अध्यक्ष अरुण इंगळे इत्यादी मान्यवर होते. जवळपास पंच्याहत्तर कवींनी या संमेलनात आपला सहभाग नोंदविला. त्याचे परीक्षण कवी विलास पंचभाई यांनी केले व त्यानुसार सर्वेश साबळे व निशांत गुरू यांना प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला. द्वितीय क्रमांक सोनाली चव्हाण आणि नितीन गढवे यांना तर तृतीय क्रमांकही भावेश जाधव आणि माधुरी अमृतकर यांना विभागून देण्यात आला.

# के.बी.एच. विद्यालयात दीपक भोसले यांचे व्याख्यान

## विद्यार्थ्यांनी घेतली क्रीडा, आरोग्यविषयी जनजागृती करणारी सामूहिक शपथ





**नाशिक ।** गंगापूर रोड येथील कर्मवीर भाऊसाहेब हिरे विद्यालय येथे हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांची जयंती अर्थात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय क्रीडादिनाचे औचित्य साधून नाशिकचे आयर्न मॅन व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू दीपक भोसले यांचे "आरोग्य व क्रीडा विषयक" व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय पवार होते तर प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक धनंजय देवरे, ज्येष्ठ शिक्षक नरेंद्र पाटील, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. रक्षा मंत्रालय भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार उपशिक्षक संजय बाविस्कर यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा व आरोग्य विषयी जनजागृती करणारी सामूहिक शपथ दिली. त्यानंतर मुख्याध्यापक संजय पवार यांच्या हस्ते दीपक भोसले यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उपस्थितांना मार्गदर्शन करताना भोसले म्हणाले की, व्यायाम व क्रीडा या गोष्टींची सवय लागणे आवश्यक असते. त्यामुळे आपले आरोग्य तर चांगले राहतेच; पण आपल्यामधील कलागुणही विकसित होतात. आरोग्य विषयक काळजी घेताना आपण संतुलित आहार घेतला पाहिजे व आपल्या कृतीतून त्या आहाराचा योग्य विनियोग देखील झाला पाहिजे. येणाऱ्या काळातही मी आपल्याला योगा संदर्भात व क्रीडा संदर्भात मार्गदर्शन करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांनी क्रीडा विषयी व आरोग्य विषयी समस्या व त्यावरील उपाय जाणून घेतले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व मुख्याध्यापक संजय पवार उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले. भोसले सरांच्या रूपाने आज आपल्याला आरोग्य विषयी उत्तम मार्गदर्शन करणारा आरोग्यदूत लाभला आहे. त्यामुळे सरांचे मार्गदर्शन आपल्यासाठी भविष्यासाठी नेहमीच बहुमूल्य ठरणार आहे.

सूत्रसंचालन मनीषा गांगुर्डे यांनी तर आभारप्रदर्शन प्रशांत देवरे यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लासलगाव येथे चौथ्या श्रावण सोमवारनिमित्त सजावट व प्रसाद वाटप



**विंचूर ।** लासलगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे आणि सोनिया होळकर चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्षा सोनिया होळकर यांच्या हस्ते आरती करण्यात आली.तसेच लासलगाव आगार प्रमुख सविता काळे लासलगाव पोलिस ठाण्याचे पोलिस नाईक बारगळ उपस्थित होते. बाबा अमरनाथ ग्रुपचे सदस्य दत्तात्रय भांबारे यांनी सजावट केली बम बम भोले या जयघोष करून प्रसादाचे वाटप करण्यात आले. मंदिराचे बांधकाम सुरू असल्याने चुरम्याचा प्रसाद करण्यात आला सजावट पाहण्यास महिलांची व बालगोपालाची गर्दी बघावयास मिळाली. बाबा अमरनाथ ग्रुपचे सर्व सदस्यांनी मोलाचे योगदान देण्यात आले.

# मविप्र कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे आयुर्वेदिक औषधी वनस्पतींचे वृक्षारोपण



**नाशिक ।** मविप्रच्या कॉलेज ऑफ फार्मसी, नाशिक यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत होरायझन अकॅडमी, ओझर येथे पर्यावरण संवर्धन आणि आरोग्य जनजागृतीसाठी औषधी वनस्पतींच्या वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत शालेय परिसरात आयुर्वेदिक औषधी वनस्पती लावून हिरवेगार आणि आरोग्यदायी वातावरण निर्मितीचा प्रयत्न केला. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी लावलेल्या वनस्पती औषधी गुणधर्मांनी युक्त असून शालेय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून आयुर्वेदिक औषधींचे महत्त्व समजून घेण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात म. वि. प्र. समाजाचे उपसभापती डॉ. डी. बी. मोगल, संचालक शिवाजी गडाख आणि शिक्षणाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाली. यावेळी सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, कार्यकारी मंडळ, आणि शिक्षणाधिकारी डॉ. अजित मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. होरायझन अकॅडमी शाळेच्या मुख्याध्यापिका मीरा पांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. व्ही. डेर्ले आणि उपप्राचार्य डॉ. जी. बी. जाधव यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. आनंद सावकारे आणि डॉ. कृष्णा मुंडलोड़ (रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी) यांनी विशेष परिश्रम घेतले. गेल्या तीन वर्षांपासून त्यांच्याच मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाकडून विविध ठिकाणी वृक्षारोपण उपक्रम राबवले जात आहेत. या वर्षीच्या उपक्रमात सुमारे १२५ विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदविला. प्रतीक दळवे, ज्ञानेश्वर गीरे, शंकर खंडारे, निखिल रक्कीबे, आदित्य भांडवलकर, नितांत हिवराळे आणि इशिता देवरे यांनी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून विशेष योगदान दिले.

# सोमठाणा येथे भजनी मंडळातर्फे गणेश उत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन



**वावी ।** सिन्नर तालुक्यातील सोमठाणा येथे विश्व पंढरी वारकरी शिक्षण सेवाभावी संस्था सोमठाणे व सदगुरू जोग महाराज भजनी मंडळ सोमठाणे यांच्या संयुक्त विद्यमानाने सालाबादप्रमाणे यंदाही गणेशउत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे.

मंडळाचे हे ८ वे वर्ष असून गणेश उत्सवात मंडळाच्यावतीने प्रतिदिन ज्ञानेश्वरी पारायण करण्यात येत असून सायंकाळी महाआरती झालेनंतर तीर्थप्रसाद सह रात्री ७ ते ९ वा. कीर्तन महोत्सव व रात्री ९ नंतर सुमधूर भजन संध्येचे आयोजन करण्यात आलेले आहे.कार्यक्रमाची सांगता अनंत चतुर्थीच्या दिवशी महाप्रसाद वाटपाने करण्यात येणार आहे.सदर भजणी मंडळ हे कायमच राज्यातील सांस्कृतिक वारसा आणि भक्तिसंस्कृती व वारकरी संप्रदाय जपण्यासाठी भजन, कीर्तनाच्या माध्यमातून कार्यरत असतात. संस्थेचे अध्यक्ष हभप प्रसाद महाराज कानडे, प्रवीण कोकाटे, मच्छिंद्र चव्हाणके, द्वारकानाथ कोकाटे, चिंतामणी वैद्य, नंदू धोक्रट, बबन पठाडे, विक्रम कोकाटे, अलका वैद्य, संगीता कु-हे, सविता उंडे, सुमन कानडे, वैजयंती बैरागी, शकुंतला धोक्रट आदींसह अनेक वारकरी उपस्थित रहात कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन पार पाडतात.किर्तन, भजन कार्यक्रमास परिसरातील अबाल वृद्धांसह तरूण मोठ्या संख्येने सहभागी होतात.

# भंगाराचे दुकान असलेल्या वडिलांच्या मुलाने पटकावले कॉमनवेल्थ गोल्ड मेडल!

नैवेद्या बिदरी







**मनमाड ।** प्रत्येक पालकाला वाटते की आपला पाल्य हा आपल्यापेक्षा मोठा व्हावा आणि राज्यातच नव्हे देशात तिचे नावलौकिक व्हावे. असेच कार्य नाशिक जिल्ह्यातील तिसरा क्रमांकाचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मनमाड शहरात भंगाराचे दुकान असलेल्या वडिलांची एकच इच्छा होती की, मुलाने शिक्षणात पुढे जावं.. पण मुलाने खेळ निवडला,... अन् अवघ्या आठराव्या वर्षी तब्बल ३४८ किग्रॅ वजन उचलत साईराज परदेशीने कॉमनवेल्थ गोल्ड मेडल जिंकले. यामुळे शहराचे सर्वत्र भरभरून कौतुक होत आहे.

साईराज परदेशी भारतीय वजनउत्थान क्षेत्रातील एक चमकता स्टार आहे.ज्याने जूनियर पुरुष ८८ किग्रॅ वजन वर्गात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. अहमदाबादमध्ये २०२५ च्या कॉमनवेल्थ वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये साईराजने एकूण ३४८ किग्रॅ वजन उचलले.ज्यामध्ये १५७ किग्रॅ स्नॅच आणि १९१ किग्रॅ क्लिन अँड जर्क समाविष्ट होते. या दोन्ही प्रकारात त्याने नवीन रेकॉर्ड्स स्थापित करून आपली अद्वितीय ताकद आणि कौशल्य सिद्ध केले.

साईराजचे प्रदर्शन हे केवळ त्याच्या शारीरिक क्षमतेचे उदाहरण नाही, तर त्याच्या कठोर परिश्रम, चिकाटी आणि समर्पणाचे प्रतीक आहे. लहान वयातच जागतिक पातळीवरील स्पर्धेत एवढे उल्लेखनीय प्रदर्शन करणे हे त्याच्या आत्मविश्वासाची आणि मेहनतीची स्पष्ट दखल आहे. त्याच्या या कामगिरीमुळे भारतीय वजनउत्थान खेळाडूंना जागतिक स्तरावर नाव कमावण्याची नवी प्रेरणा मिळाली आहे.

साईराज परदेशी फक्त सुवर्ण पदक जिंकणारा खेळाडू नाही; तो तरुण खेळाडूंना प्रेरणा देणारा आदर्श आहे. भविष्यातील आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे नाव उज्वल करण्यासाठी साईराजची मेहनत आणि समर्पण निश्चितच एक उदाहरण ठरेल...

# मग, शासन दुटप्पी का?



महाराष्ट्रातील सामाजिक राजकीय परंपरेत मराठा समाजाचे योगदान अतुलनीय आहे. शौर्य, पराक्रम, शेतमजुरी, नेतृत्व आणि समाजकारण यातून हा समाज घडला. पण गेल्या अनेक दशकांपासून मराठा समाजाला आरक्षणाचा प्रश्न चिघळत ठेवण्यात आला आहे. हा प्रश्न फक्त आरक्षणा पुरता मर्यादित नाही, तर मराठा व कुणबी हे एकच आहेत का? या मूळ प्रश्नावर तो आधारलेला आहे.

-------------

आज मनोज जरांगे पाटील यांसारखे लढवय्ये कार्यकर्ते ठामपणे सांगत आहेत मराठा, कुणबी, पाटील, देशमुख हे स्वतंत्र नाहीत; हे सर्व एकाच समाजाचे भाग आहेत. याचे पुरावे इतके ठोस आहेत की, कोणत्याही शासनाने किंवा न्यायालयाने त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे न्याय, समाज आणि इतिहास या तिन्हींचा अपमान आहे.

**इतिहास आणि परंपरेतील एकात्मता**

मराठा आणि कुणबी समाजात विवाह, बेटीव्यवहार, रोटीव्यवहार शतकानुशतके होत आले आहेत. कुणबी शेतकरी, पाटील गावप्रमुख, देशमुख परगण्याचे नेते आणि मराठा योद्धा अशी विभागणी ही कार्यपद्धतीवर आधारित होती, जातिभेदावर नव्हे. त्यामुळे कुणबी आणि मराठा या नावांमध्ये भिन्नता असली तरी त्यांच्या जीवनपद्धती, परंपरा, संस्कृती आणि सामाजिक आचार एकच राहिले आहेत.

मराठा म्हणजे कुणबी, आणि कुणबी म्हणजे मराठा, ही धारणा फक्त लोक कथांमध्ये नाही, तर सामाजिक घटनांमध्ये प्रत्यक्ष दिसून येते. ग्रामीण भागातील असंख्य कुटुंबे मराठाझकुणबी नात्यांनी एकमेकांशी जोडलेली आहेत. कुणबी घरातील मुलगी मराठा घरात जाते, मराठा घरातील मुलगी कुणबी घरात जाते, आणि कुठेही अडचण येत नाही. जर हे दोन वेगळे समाज असते, तर असा स्नेहसंबंध कसा शक्य झाला असता?

**न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय**

१९२१ साली मुंबई हायकोटार्ने दिलेला निर्णय हा या वादावर शिक्कामोर्तब करणारा आहे. त्या निर्णयात स्पष्ट नमूद केले आहे की, मराठा (क्षत्रिय) आणि कुळंबी/कुणबी हे एकच आहेत. न्यायालयासमोर ठेवलेले पुरावे, परंपरा आणि सामाजिक नोंदी यांच्या आधारे हा निष्कर्ष नोंदवला गेला.

म्हणजे शंभरहून अधिक वर्षांपूर्वी न्यायालयाने हा वाद संपवून टाकला होता. तरीदेखील आज शासन हीच गोष्ट मान्य करण्यास तयार नाही. हे प्रशासनाच्या दुटप्पी वृत्तीचे द्योतक आहे.

**शासनाची टाळाटाळ**

जर शासनाने खरोखरच समाज हिताचा विचार केला असता, तर एका साध्या शासन निर्णयाने (जीआर) ने हा प्रश्न कायमचा सुटू शकला असता. याआधी ओबीसी प्रवर्गात अनेक जातींना समाविष्ट करण्यात आले आहे. त्यासाठी जीआर काढून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. मग मराठा समाजाला त्याच पद्धतीने न्याय का दिला जात नाही?

खरे तर, प्रश्न इतकाच आहे की शासनाला समाजाला न्याय द्यायचा आहे का नाही? कारण प्रक्रिया कठीण नाही, पण राजकीय धाडस लागते.

गजानन कुसुम ओंकार हरणे
लेखक, साहित्यिक कवी, वक्ता
राज्य उपाध्यक्ष,
अ. भा. मराठा सेवा संघ
जिल्हा परिषद नगर,
खडकी, अकोला
9822942623

**फोडा आणि राज्य करा..चा खेळ**

आज राज्यात शासन-प्रशासनाकडून "फोडा आणि राज्य करा" हीच नीती वापरली जात आहे. एकीकडे ओबीसींना प्रोत्साहन, दुसरीकडे मराठ्यांना दडपण, आणि तिसरीकडे या दोन समाजांत संघर्ष उभा करणे हा खेळ सुरू आहे.

"एक भाऊ मराठा, एक भाऊ कुणबी, एक भाऊ देशमुख" हे सर्व स्वतंत्र नाहीत, पण त्यांना वेगळे मानून राजकीय पोळी भाजली जात आहे.

**आंदोलनांचा उद्रेक**

आज मनोजदादा जरांगे पाटील यांसारखे सामाजिक कार्यकर्ते मुंबईत आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांचा मुद्दा एकच आहे शासनाने त्वरित निर्णय घेऊन मराठ्यांना ओबीसी प्रमाणपत्र द्यावे. कारण शासन जितका वेळ खेचत आहे, तितका समाजातील असंतोष वाढत आहे. महाराष्ट्रात कुठेही आंदोलन भडकू शकते.

शासनाला जर खरंच राज्यातील शांतता जपायची असेल, तर हा प्रश्न लगेच सोडवायला हवा. नाहीतर परिस्थिती बिघडण्याची पूर्ण शक्यता आहे.

**प्रश्न सुटण्याचा मार्ग सोपा**

या प्रश्नाला सोडवण्यासाठी फार मोठा कायदेशीर गोंधळ नाही. शासनाने एक शासननिर्णय काढून मराठा, कुणबी, पाटील, देशमुख हे एकच असल्याचे स्पष्ट करावे, आणि त्या सर्वांना ओबीसी प्रमाणपत्र देण्याचे आदेश द्यावेत.

केंद्र सरकारकडे सुद्धा या संदर्भात कायदेकरीता मार्ग उपलब्ध आहे. इच्छाशक्ती असेल, तर हा प्रश्न एका दिवसात निकाली निघू शकतो. पण इच्छाशक्तीच नसल्याने हा प्रश्न वर्षानुवर्षे लांबणीवर टाकला जात आहे.

**सामाजिक सलोखा धोक्यात**

जातीय वाद निर्माण करून राजकारण करणाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवे की, समाजातील शांतता आणि एकोपा हा महाराष्ट्राचा आत्मा आहे. जर शासनाने न्यायालयीन निर्णय, सामाजिक परंपरा आणि लोकभावना मान्य केली नाही, तर सामाजिक सलोखा धोक्यात येईल.

आज काळाची गरज आहे,माणसाने माणसाला जोडावे, माणसाने माणसाला वाचवावे. समाज फोडण्या ऐवजी समाज जोडण्याचे काम शासनाने करावे.

**निष्कर्ष**

मराठा, कुणबी, पाटील, देशमुख हे वेगवेगळे नाहीत; ते सर्व एकाच समाजाचे वारकरी आहेत. याचे पुरावे इतिहास, परंपरा, सामाजिक संबंध आणि न्यायालयीन निर्णय या चारही स्तरांवर निर्विवाद आहेत. मग प्रश्न आहे शासन हे सत्य का मान्य करत नाही? समाजाला वेगळे करून, वाद निर्माण करून, राजकारण साधायचे आहे म्हणून का?

शासनाने लक्षात ठेवावे की, हा प्रश्न लांबवला गेला, तर महाराष्ट्रातील सामाजिक सौहार्द, लोकशाहीवरील विश्वास आणि युवकांच्या भवितव्याला मोठा धोका निर्माण होईल.

म्हणूनच काळाची हाक स्पष्ट आहे...

मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देण्यासाठी तातडीने जीआर काढावा.

१९२१ च्या हायकोर्टाच्या निर्णयाला मान्यता द्यावी.

समाजाला जोडणारा निर्णय घेऊन महाराष्ट्राचा सामाजिक सलोखा अबाधित ठेवावा.

आजची पिढी या प्रश्नाचे उत्तर अपेक्षीत आहे. शासनाने फोडा आणि राज्य करा.. ही नीती बाजूला ठेवून, जोडा आणि न्याय द्या.. ही नीती स्वीकारली, तर महाराष्ट्राच्या समाजजीवनाला नवी दिशा मिळेल.

---

# कुपोषण : सकस पोषण आहारांचे फलीत!

राज्यातील बालकांचे कुपोषण रोखण्यासाठी विविध प्रकारच्या उपयोजना आज अमलात असल्या तरी त्या अपयशी ठरत आहेत. त्यामुळे पाच वषार्खालील प्रत्येकी तीन पैकी एक बालक कुपोषित असल्याचा धक्कादायक निष्कर्ष अलीकडेच भारतीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या (आयआयपीए) या अभ्यासाच्या अहवालातून म्हटल्याचे वृत्त समोर आले.

या अभ्यास अहवालानुसार राज्यात पाच वषार्खालील पस्तीस टक्के मुले वाढ खुंटलेली व कमी वजनाची आणि सव्वीस टक्के कुपोषित आहे. म्हणजेच प्रत्येकी तीन पैकी एक मूल कुपोषित असल्याचा निष्कर्ष या संस्थेने काढला आहे. तसेच (आयआयपीए) च्या सुक्ष्म अभ्यासानुसार राज्यात १९९२ मध्ये मध्यम कुपोषणाचे प्रमाण विस टक्के होते. ते २०२१ मध्ये सव्वीस टक्क्यांवर पोहचले.

जन्माच्या वेळी बाळाचे वजन कमी. लहान वयात मातृत्व. शिक्षणाचा अभाव. अस्वच्छ राहणीमान. आणि स्तनपानाचा विलंब या बाबी बालकांच्या कुपोषणास कारणीभूत ठरल्या होत्या व आजही बहुतांशी त्या कायम आहेत. बाल कुपोषणाच्या संदर्भात २०१४ पासून तर २०२१ पर्यंत पोषण स्थितीत फारसा असा बदल झाला नाही, त्यामुळे कुपोषणाची तीव्रता ही दिवसेंदिवस वाढतचं आहे.

ग्रामीण भागातील वाढत्या कुपोषणाच्या संदर्भात सामाजिक व आर्थिक विषमता, पोषण आहाराचा अभाव आणि अपुरी आरोग्य व्यवस्था हे घटक कारणीभूत आहे. तर शहरी भागातील कुपोषणांच्या प्रमुख कारणांमध्ये ग्रामीण भागातून शहरांकडे होण्याऱ्या स्थलांतरित मजुरांची वाढती संख्या होय. तसेच त्यांचे अत्यंत निकृष्ट जीवनमान मानले पाहिजे.

खेड्यातून रोजगारासाठी महानगरांकडे स्थलांतरित होणाऱ्या या कुटुंबीयांना ना पुरेशी आरोग्य सुविधा असते, ना सकस पोषण आहार, ना शुद्ध पिण्याचे पाणी. हात मजुरीवर काम करणाऱ्या लाखों कुटुंबावर दोन वेळेचे पोटभर अन्न मिळण्याची क्षमता नाही.

त्यात निरक्षरता, आर्थिक चणचण, महिला व बालकांच्या आरोग्याची होणारी हेळसांड, वाढती महागाई, ढासळती आर्थिक परिस्थिती अशा अगणित समस्यांच्या गर्तेत मुलांना सकस आहाराचा पुरवठा पाल्यांच्या आवाक्या बाहेरचा ठरतो. आज सकस पोषण आहारांच्या अभावामुळे कुपोषणाची अधिकाधिक तीव्रपणे होत आहे.

बाल कुपोषण कमी करण्याच्या संदर्भात राज्य शासनाच्या अनेक योजना कार्यान्वित आहेत. लाखो आरोग्य कर्मचारी, विविध टास्क फोर्स, शिबिरे सुद्धा उभारली जातात. आर्थिक बजेटमध्ये तरतुदी केली जाते. तरीसुद्धा बाल कुपोषणाची तीव्रता दिवसेंदिवस वाढताना दृष्टीस पडते. शासन पातळीवर 'इंटिग्रेटेड चाइल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिसेस', 'मिशन पोषण २.०', 'सुपोषण अभियान' अशा योजनांची आखणी आहे. परंतु याही योजना नेहमीप्रमाणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही.

शहरी भागातील बालकुपोषण हे स्थलांतरित कुटुंबीयांच्या बालकांची संबंधित आहे.यातील बालके शाळाबाह्य आहेत. त्यामुळे शालेय पोषण आहाराचा कुठलाही लाभ यांना मिळत नाही. कुपोषणाच्या बाबतीत पोषण शिक्षण हे महत्त्वाची बाब आहे. मात्र त्याची पूर्तता सुलभ होणे जरुरीचे आहे.

राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते.ही योजना मुख्यत्वे शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांच्या भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासासाठी आहे.पोषणयुक्त आहार, लसीकरण,आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातून देण्याचा व्यापक प्रयत्न व्हायला हवा.

राज्यातील कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील अंगणवाड्या आज स्वतःच्या इमारतीविना आहेत. समाज मंदिरात, पत्रांच्या शेडमध्ये, भाड्याच्या जागेत, तर कुठे उघड्या झाडाखाली सुद्धा भरतात. त्यात मोठी सुधारणा आज अपेक्षित आहे.

बाल कुपोषणाच्या समस्येवर मात करीत असताना कुपोषित बालकांच्या पालकांचे स्थलांतर थांबवले पाहिजे.

कुपोषित बालकांच्या कुटुंबांचे विशेष सर्वेक्षण करून त्यांच्या सकस पोषणावर भर देणे गरजेचे ठरते. कुपोषणाची समस्या ही आरोग्याशी संबंधित नव्हे, तर विकासाची आणि आर्थिक प्रगतीची समस्या आहे. त्यामुळे बाल कुपोषण नियंत्रणासाठी सवोतीपरी प्रामाणिक प्रयत्न होणे आवश्यक आहे.

■ ■ ■



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८
shashikanttote1979
@gmail.com

---

# शालार्थ घोटाळा : पोलिसांच्या एकापेक्षा अधिक एसआयटी बरखास्त

नागपूरमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या अतिसक्रिय पोलिस कारवाईला अखेर आळा बसला आहे. शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा प्रशासन यांना मोठ्या प्रमाणावर गुन्हेगार ठरविण्याच्या प्रवृत्तीला आळा घालत नागपूर एसआयटी तसेच पोलिस महासंचालकांच्या एसआयटीचे औपचारिक विसर्जन करण्यात आले आहे. यामुळे आता संपूर्ण चौकशीसाठी एकच राज्यस्तरीय प्रशासकीय एसआयटी जबाबदारी घेणार आहे.

या प्रकाशनाचे वाचक आणि माज्या लेखांचे अनुसरण करणाऱ्यांसाठी ही घटना नवीन नाही. माज्या २३ जुलै २०२५ च्या लेखात मी स्पष्ट केलं होतं की नागपूर पोलिसांनी सुरू ठेवलेल्या अटक मोहीमा आणि समन्स हे कायदेशीरदृष्ट्या संदिग्ध आहेत. कारण एकाच गुन्ह्याची समांतर चौकशी वेगवेगळ्या यंत्रणांनी करणं न्यायालयीनदृष्ट्या अमान्य ठरू शकतं. सर्वोच्च न्यायालयानेही वारंवार यावर स्पष्ट मत दिलं आहे.

**या निर्णयाचा अर्थ काय?**

**एकत्रित अधिकारक्षेत्र** : स्थानिक युनिट्सने जमा केलेले सर्व कागदपत्र, पुरावे व चौकशी आता राज्यस्तरीय एसआयटीकडे हस्तांतरित होणार.

न्यायालयीन पुनरावलोकन शक्य : नागपूर पोलिसांनी आधी दिलेले समन्स आता अधिकारक्षेत्राच्या कारणावरून न्यायालयीन आक्षेप घेतला जाऊ शकतो.



अरुण सोपानराव कराळे
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

**शाळांना दिलासा** : अचानक कारवाया आणि विभागीय चौकशीतील निष्कर्ष न लागल्यामुळे निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणाला हा निर्णय काही प्रमाणात शांत करतो.

**मुख्य प्रवाहातील माध्यमांतील उणीव** : बहुतेक वृत्तपत्रांनी ही बातमी केवळ प्रशासकीय घोषणा म्हणून दिली. परंतु, यामागील गोंधळ, अनावश्यक खर्च आणि नागरिकांना होणारे त्रास याकडे फारसं लक्ष दिलं नाही. दुर्लक्षित झालेले काही महत्त्वाचे प्रश्न असेः

राज्यव्यापी एसआयटी स्थापन झाल्यानंतरही अनेक स्थानिक एसआयटींना कारवाई का करू देण्यात आली?

या तांत्रिक आणि प्रक्रियात्मक चुकांमुळे झालेल्या शासकीय खर्चासाठी जबाबदार कोण?

शिक्षक, कर्मचारी यांसारख्या सर्वसामान्य नागरिकांना अनावश्यक छळापासून वाचवण्यासाठी काय हमी आहे?

माझं विनम्र आवाहन आहे की पत्रकार आणि माध्यमसंस्था फक्त सनसनाटी किंवा विभागीय निवेदनं पोहोचवणं थांबवावं. नागरिकांना तांत्रिक आणि कायदेशीर बाबींचं स्पष्ट, साध्या भाषेत स्पष्टीकरण हवं आहे. पत्रकारिता ही स्वतंत्र तपासणीची भूमिका निभावली पाहिजे, केवळ सरकारी घोषणांचा प्रतिध्वनी नव्हे.

**निष्कर्षः**

स्थानिक आणि अनेक एसआयटींचं विसर्जन हा स्पष्टता देणारा दुरुस्तीचा निर्णय आहे. मात्र या संपूर्ण घटनेतून शिकण्यासारखं म्हणजे या गोष्टींवर नियंत्रण फक्त भविष्योन्मुख पत्रकारिता आणि सखोल विश्लेषणानेच ठेवता येईल.


निर्दोष शिक्षक, मुख्याध्यापक व संस्थाचालकांनी एकत्रित कायदेशीर बचावाची युक्ती विचारात घेतली पाहिजे. कारण वाढत्या वकिली खचार्मुळे न्यायालयीन लढाई लांबणीवर पडून ती असमान होऊ शकते.

आपल्या समाजातील शिक्षकांना सरसकट गुन्हेगार ठरविण्याचा प्रयत्न झाला, तर त्याचे परिणाम पुढच्या पिढ्यांवर भीषण स्वरूपात उमटतील.

■ ■ ■

---

## अंधारात डोळ्यांना प्रकाश देणारी लेन्स



चीनमधील **विज्ञान** आणि **तंत्रज्ञान** विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी एक **कॉन्टॅक्ट लेन्स** तयार केला आहे. जो लोकांना **रात्री** पाहण्यास मदत करेल.

**लेन्स कसे काम करते?**

हे कॉन्टॅक्ट लेन्स **सोने, सोडियम** आणि गॅडोलिनीयमच्या नॅनोपार्टिकल्सपासून बनलेले आहे. हे नॅनोपार्टिकल्स 800 ते 1600 नॅनोमीटरच्या **इन्फ्रारेड प्रकाशाचे** 3 प्राथमिक रंगामध्ये रूपांतर करतात. यामुळे तो **प्रकाश मानवांना** दिसेल.

**या लेन्सचे** सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते कोणत्याही **शस्त्रक्रियेशिवाय काम** करते. डोळे बंद करूनही हे लेन्स **चांगले काम करते. कारण** इन्फ्रारेड प्रकाश पापण्यांमधून **जाऊ शकतो.**



**तथापि, या लेन्समधून दिसणारे फोटो थोडे अस्पष्ट आहेत. याबद्दल अजूनही प्रयोग सुरू आहेत. तेनाईट व्हिजन गॉगल इतके शक्तिशाली नाहीत.**



---

# अचलपूर मतदारसंघ राजकीय पार्श्वभूमी

अचलपूर हा महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील एक महत्वाचा विधानसभा मतदारसंघ आहे. २०२४ विधानसभा निवडणूकांमध्ये तीन प्रमुख राजकीय प्रवाह – भाजपा (भाजप), काँग्रेस आणि प्रहार जनशक्ती पक्ष यांचा समांतर सामना झाला.




या मतदारसंघात प्रहार जनशक्ती पक्षाने (पीजेपी) २०१९ मध्ये विजयी प्राप्त केला होता, ज्याचे प्रतीक म्हणजे चारवेळेस आमदार राहिलेला बच्चू कडू. काँग्रेस आणि भाजपसह इतरही पक्ष स्पर्धेत होते.

२०२४ निवडणूक निकाल आणि विरोध

२० नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या निवडणुकीतः भाजपचे प्रवीण वसंतराव तायडे विजेत झाले, ७८,२०१ मतांनी पीजेपीचे बच्चू कडू दुसऱ्या क्रमांकावर, ६६,०७० मतांनी. काँग्रेसचे अनिरुद्ध उर्फ बबलुभाऊ सुभानराव देशमुख हे तिसऱ्या स्थानावर, ६२,७९१ मतांनी.)

मतांच्या टक्केवारीतही भाजपचा प्रबल वर्चस्व दिसते. भाजप ३६.७७%, पीजेपी ३१.०७%, काँग्रेस २९.५२%.)



बादलकुमार डकरे
चांदूर बाजार

या निवडणुकीतील मुख्य स्पर्धा थेट भाजप व काँग्रेसमध्ये नव्हती, तर आणि भाजपमध्ये होती. काँग्रेस विशिष्ट तिसऱ्या नंबरवर होता आणि तितक्या जोरात स्पर्धा करत नसल्याचे चित्र दिसते. तथापि, मतांची तफावत खूप घट्ट होती, त्यामुळे काँग्रेसला अदरक पदवीदार न मिळणे हीच घटना ठरली.

भाजपकडून ही विजयाची धक्का – स्थानिक प्रभाव, प्रस्थापित राजकीय संघटन आणि ताज्या लोकल ट्रेंडचा परिणाम मानले जाऊ शकतात. काँग्रेसकडेही मजबूत ऐतिहासिक आधार असून, तो हा क्षेत्र पीजेपी आणि भाजपमध्ये वाटला गेला.

**भाजपचा प्रसार आणि प्रत्याशीची जबाबदारी**

प्रवीण तायडे हे नव्या उमेदवार असूनही भाजपा संघटनेत प्रभावी भूमिका बजावली, ज्यामुळे त्यांनी विजयाचा झोका साधला.

**पीजेपी व काँग्रेसची स्थानिक भूमिका**

बच्चू कडू हे दीर्घ काळ समाजातील विश्वासू राजकीय चेहरा राहिले होते, ज्यांनी प्रतिक्रिया केंद्रित केले. परंतु या वेळी त्यांच्या नेतृत्वासमोर भाजपची मजबूत संघटनेची जाळी होती. काँग्रेसने तिसऱ्या क्रमांकावर आल्याने त्यांची भूमिका अजूनही महत्त्वाची आहे. ते पुन्हा स्पर्धेत आणण्यासाठी प्रभावी रणनिती आखणे आवश्यक आहे.

पीजेपी व काँग्रेसमधील मतांचे विभाजन भाजपच्या बाजूने गेले. साधारणतः विरोधी शक्तींचे मत विभाजले गेले आणि निश्चित राजकीय गटाला फायदा झाला. भाजपने केंद्र व राज्य स्तरावरील धोरणांचा प्रमुख फायदा घेतला असण्याची शक्यता आहे.

२०२४ निकालांनी स्पष्ट केले की, काँग्रेस पीजेपीसारख्या तृतीय पयार्यांसोबत हात मिळवून स्थिर संघटन निर्माण करू शकते.

भाजपसाठी हा विजय आदर्श आहे आणि भविष्यातील स्पर्धेत त्यांनी आपल्या तळाची व्यापक रणनीती आखावी.

स्थानिक मुद्दे (सामाजिक, विकासात्मक, मतदारांशी संवाद) यांमध्ये दोन्ही पक्षांनी पुढील काळात अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

अचलपूर मतदारसंघात २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप, पीजेपी आणि काँग्रेस यांच्यात रणनीतिक आणि तात्विक स्पर्धा घडली. भाजपचे विजय हे संघटनात्मक ताकद, लोकल जनसमर्थन व प्रबल प्रचार यांचा परिणाम होते. पीजेपीचा दीर्घकालीन प्रभाव कमी झाला असला तरी त्यांची लोकप्रीयता अद्याप कायम आहे. काँग्रेससाठी ही जागा पुन्हा स्पर्धात्मक बनवण्यासाठी संघटनात्मक सुधारणा व संवाद धोरणांना प्रामुख्याने स्थान देणे गरजेचे आहे.

या प्रकारच्या राजकीय परिदृश्यात, स्थानिक नेतृत्व, जनादेशाचा प्रवाह व संघटनाचे समन्वय हे निर्णायक ठरतात. पुढील निवडणुकांमध्ये अचलपूरवर कोणते पक्षात्मक किंवा कॉआलिशनमूलक परिणाम दिसतील, हे उत्सुकतेने पाहायला मिळेल.

■ ■ ■

---

## वाचक लिहितात

### सुखसमृद्धीसाठी ज्येष्ठा गौरी व्रत...

भाद्रपद शुक्ल पक्षात ज्येष्ठा गौरी व्रत केले जाते. अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया हे व्रत करतात. पुराणात अशी कथा आहे की, असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया श्रीमहालक्ष्मी गौरीला शरण गेल्या. त्यांनी आपले सौभाग्य अक्षय करण्याविषयी तिची प्रार्थना केली. श्रीमहालक्ष्मी गौरीने भाद्रपद शुक्ल अष्टमीला असुरांचा संहार करून शरण आलेल्या स्त्रियांच्या पतींना तसेच पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले. म्हणूनच अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरीचे व्रत करतात.

हे व्रत तीन दिवस चालते. महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पाच लहान मडक्यांची उतरंड रचून त्यावर गौरीचा मातीचा मुखवटा बसवतात. काही ठिकाणी सुवासिक फुलांच्या वनस्पतीची रोपे किंवा तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवली जाते आणि त्यावर मातीचा मुखवटा चढवतात. त्या मूर्तीला साडी नेसवून अलंकारांनी सजवले जाते.

काही ठिकाणी धातूची किंवा मातीची प्रतिमा करून अथवा कागदावर श्रीमहालक्ष्मीचे चित्र काढून पूजन केले जाते; तर काही ठिकाणी नदीकाठचे पाच लहान खडे आणून त्यांचे गौरी म्हणून पूजन करतात.

गौरीची स्थापना झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तिची पूजा करून नैवेद्य दाखवतात. तिसऱ्या दिवशी गौरीचे विसर्जन करतात. ज्येष्ठा गौरी व्रत केल्याने श्रीगणेशासह श्रीमहालक्ष्मीचा कृपाशीर्वाद लाभतो आणि ऐहिक जीवनात सुख-समृद्धी प्राप्त होते.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा

### श्राध्दाचे महत्त्व

व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्यांच्या आत्म्यास सद्गती मिळावी म्हणून श्राध्द केले जाते. भाद्रपद महिन्यातील कृष्णपक्षात पंधरा दिवस हे महालय श्राध्द करण्यासाठी असतात. श्रध्दा या शब्दापासून श्राध्द हा शब्द तयार झाला आहे. श्रध्देने केले जाते ते श्राध्द होय. देश, काल आणि योग्य स्थळ पाहून श्रध्दा तसेच विधींनी युक्त असे पितरांना उद्देशून ब्राम्हणांना जे काही दिले जाते त्याला श्राध्द असे म्हणतात.

इहलोक सोडून गेलेल्या आपल्या वाडवडीलांनी आपल्यासाठी आपण जन्माला आल्यापासून जे काही केले आहे त्याची परतफेड करणे अशक्य असते. श्राध्द म्हणजे पितरांचे कृतज्ञतेने स्मरण करणे एवढेच नाहीतर तो एक विधी आहे. श्राद्ध केल्याने पितरांचे रक्षण होते. पितरांना पुढच्या पुढच्या टप्प्यात गती मिळून त्यांचा पुढील प्रवास सुखाचा होतो. श्रध्देने श्राध्द करणाऱ्या वंशजांचेही जीवन सुखकर होते. कारण श्रध्देने श्राध्द केल्याने त्यांना त्यांच्या पितरांचे कृपाशीर्वाद मिळतात. श्राध्द केल्याने पितर वर्षभर तृप्त रहातात.

■ भीमराव साळुंखे, सातारा.

---



# या ड्रायफ्रूट्सचे सेवन आरोग्यासाठी वरदान

शरीर निरोगी आणि तंदुरस्त राहण्यासाठी खाण्यापिण्याच्या सवयी योग्य असाव्या लागतात. अनेकजण त्यांच्या आहारात ड्रायफ्रुट्सचा समावेश करत असतात. जसे की काजू, नट्स, बदाम, पिस्ता. पिस्ता हा इतर ड्रायफ्रुट्सपेक्षा महाग आहे. परंतु त्यात आढळणारे पोषक घटक आपल्या आरोग्याला अनेक प्रकारे फायदेशीर ठरतात.

**पिस्ता खाण्याचे फायदे**

पिस्ता आरोग्यासाठी इतर ड्रायफ्रुट्सपेक्षा जास्त फायदेशीर आहे. त्यात व्हिटॅमिन बी 6, प्रथिने, खनिजे, फायबर आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म भरपूर असतात, जे आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात.

पिस्त्याचे सेवन अनेक आजारांना प्रतिबंध करते. यात ल्युटीन आणि झेक्सॅन्थिनसारखे अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे डोळ्यांसाठी खूप फायदेशीर असतात. पिस्त्याचे सेवन केल्याने निद्रानाश, भूक न लागणे, लठ्ठपणा आणि संधिवाताच्या आजारांपासून आराम मिळतो. हृदय आणि त्वचेशी संबंधित आजारांसाठी देखील हे फायदेशीर मानले जाते.

गर्भवती महिलांसाठी पिस्त्याचे सेवन खूपच फायदेशीर मानले जाते. यातील पोषक तत्व महिलांना गर्भावस्थेत फायदेशीर ठरतात. यातील ओमेगा 3 फॅटी ॲसिड गर्भवती महिलांसाठी आणि त्यांच्या बाळांसाठी फायदेशीर ठरतात.

पिस्त्यामध्ये प्रोटिन्सचे प्रमाण अधिक असते. यामुळे आपल्या शरीरात नवीन रक्ताच्या पेशींची वाढ होण्यास आणि मासंपेशींच्या विकासात मदत होते. जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल तर पिस्ता हे हेल्दी स्नॅक्स म्हणून आहारात समावेश करू शकतात.

**पिस्ता खाण्याची योग्य पद्धतः**. तज्ञांच्या मते, पिस्ता खाण्यापूर्वी ते पाण्यात भिजवा आणि नंतर सेवन करा. कारण पिस्त्याचा स्वभाव उष्ण आहे, म्हणून ते मर्यादित प्रमाणात सेवन करा, किंवा मिठाई व इतर पदार्थांमध्ये मिक्स करून त्याचे सेवन करा. यामुळे तुमच्या अरोग्याला निश्चितच फायदा होईल.

■ ■ ■

---

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### आत्मबळ!

गणेश गौराईचा उत्सव
फुलवी भक्तिचा मळा
मनी आत्म समाधानाचा
आनंद मिळे वेगळा..!

संसाराचा गाडा ओढता
मन जेंव्हा जेंव्हा हारते
भिऊ नकोस आहे पाठीशी
हे आश्वासन उभारी देते ...

# थोडक्यात युपीएससी हुकलेल्या विद्यार्थ्यांना 'प्रतिभा सेतू'द्वारे मिळणार मोठी संधी

**नवी दिल्ली, दि. ३१ : प्रतिनिधी**

अनेक तरुण कठोर परिश्रमाने युपीएससीची (UPSC) परीक्षा उत्तीर्ण होऊन यश मिळवतात, याच परीक्षेत हजारो तरुण खूप सक्षम असतात मात्र थोड्या फरकाने अंतिम यादीत पोहोचू शकत नाहीत. आता अशा हुशार विद्यार्थ्यांना 'प्रतिभा सेतू' सारख्या प्लॅटफॉर्म द्वारे नामांकित खाजगी कंपन्या नोकऱ्या देतील, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी 'मन की बात' कार्यक्रमाच्या १२५ व्या भागात देशाला संबोधित केले. यावेळी पंतप्रधान मोदींनी काश्मीरमधील सामने, यूपीएससी परीक्षा, डोंगराळ भागात झालेला विनाशकारी पाऊस आणि भूस्खलन अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली.

पंतप्रधान मोदींनी 'मन की बात' कार्यक्रमाची सुरुवात नैसर्गिक आपत्तींपासून केली. डोंगरांमध्ये पाऊस आपत्ती बनला आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ पथकांसह सुरक्षा दलांनी सर्व शक्य मदत करण्यासाठी दिवसरात्र मेहनत घेतली आहे. सांगतानाचा त्यांनी बचाव कार्याचीही माहिती दिली.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, जम्मू आणि काश्मीरमधील २ महत्त्वाच्या घडामोडींचा उल्लेख केला. पुलवामाच्या स्टेडियममध्ये रॉयल प्रीमियर लीगच्या क्रिकेट सामन्यासाठी विक्रमी संख्येने लोक जमले होते आणि येथे दिवसरात्र क्रिकेट सामना खेळवण्यात आला होता. पूर्वी ते होणे अशक्य होते, मात्र आता देश बदलत आहे. देशातील पहिला खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सव श्रीनगरमधील दल सरोवर येथे आयोजित करण्यात आला होता. संपूर्ण भारतातील ८०० हून अधिक खेळाडूंनी त्यात भाग घेतला होता. एक भारत श्रेष्ठ भारत आणि देशाच्या एकतेची भावना देशाच्या विकासासाठी खूप महत्वाची आहे. यामध्ये खेळांची मोठी भूमिका आहे, असेही पंतप्रधान म्हणाले.

नागरी सेवा परीक्षेचा संदर्भ देत पंतप्रधान मोदी म्हणाले, अनेक तरुण कठोर परिश्रमाने युपीएससीची परीक्षा उत्तीर्ण होऊन यश मिळवतात. मात्र याच परीक्षेतील एक कटू सत्य म्हणजे हजारो तरुण खूप सक्षम असताना थोड्या फरकाने ते अंतिम यादीत पोहोचू शकत नाहीत. आता अशा हुशार विद्यार्थ्यांसाठी "प्रतिभा सेतू" नावाचे डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यात आले आहे. या प्लॅटफॉर्मवर अशा १० हजारांहून अधिक तरुणांची माहिती आहे. या पोर्टलच्या मदतीने खाजगी कंपन्याही हुशार उमेदवारांना नोकऱ्या देऊ शकतात.

# निळमाती, चिंचूतारा दरम्यान रस्त्यावरील खड्डा अपघाताला देतोय आमंत्रण
## सार्वजनिक बांधकाम विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष

**मोखाडा, दि. ३१ : प्रतिनिधी**



मोखाडा-त्र्यंबकेश्वर मार्गावर निळमाती ते चिंचूतारा दरम्यान रस्त्यावर भला मोठा खड्डा पडलेला आहे. सदर खड्ड्याचा व्यास इतका मोठा आहे की त्याने संपूर्ण रस्ताच काबीज केलेला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला साईडपट्टीला जागाच नाही. त्यामुळे या मार्गांवरून धावणाऱ्या वाहनांना खड्ड्यातूनच वाट काढावी लागत आहे. सदर ठिकाणी अरुंद रस्ता असल्यामुळे वाहनांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे. पर्यायाने येथे अपघात होऊन जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. तरीही सार्वजनिक बांधकाम उपविभाग त्याकडे सोईस्करपने दुर्लक्ष करत आहे.

मोखाडा तालुक्यातील बहुतांशी राज्यमार्गांची चाळण झालेली आहे. मालिदांच्या कामाकडे जाणीवपूर्वक पाहणारे सार्वजनिक बांधकाम विभाग मात्र खड्ड्यांच्या माध्यमातून डोकावणारी लाज उघड्या डोळ्याने पाहत असल्याने यंदा गणरायांचे आगमनही खड्ड्यातूनच झालेले आहे. मोखाडा, खोडाळा, विहिगाव आणि मनोर, वाडा, देवगाव या रस्त्यावरील खड्डे आजही ठिकठिकाणी रस्त्यावर ठाण मांडून बसलेले आहेत. मनोर, वाडा, देवगाव हा रस्ता संबंधित ठेकेदाराच्या दुरुस्तीत असला तरी सार्वजनिक बांधकाम विभागाची तितकीच जबाबदारी असून देखील प्रवाशांच्या योगक्षेमाची म्हणावी तितकी काळजी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेतली जात नाही.

मोखाडा-खोडाळा राज्य मार्गांवर डोल्हारा ते देवबांध दरम्यान निकृष्ट संरक्षण भिंती खचून गेल्यामुळे भुसभूशीत झालेला रस्ता अर्धाअधिक तुटत आलेला आहे. हिच परिस्थिती मनोर, वाडा, देवगाव रस्त्यावर खोडाळा ते वाघ्याचिवाडी दरम्यान ऐन वळणावर आहे. याबाबत ओरड झाल्यानंतर बेफिकीर सार्वजनिक बांधकाम विभागाने धोकादायक मार्गाचे अवलोकन होण्यासाठी जुजबी उपाय योजना केली होती. सदरचे दोन्हीही राज्य मार्ग हे वर्दळीचे असून या ठिकाणावरून अवजड वाहतुकीचा मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. या धोकादायक ठिकाणावरून वाहतूक करणाऱ्या नवागतांच्या लक्षात येणार नाही, अशी परिस्थिती असल्याने मोठ्या प्रमाणावर अपघात होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या सर्वच धोकादायक ठिकाणी वाहनांचे लक्ष वेधून घेण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी केली जात आहे.

# संस्थानकाळातील गणेशोत्सवाचे यंदा 128 वे वर्ष

**जव्हार, दि. ३१ : प्रतिनिधी**



संस्थांकालिन जव्हार येथील श्रीराम मंदिर सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळाचे यंदा शतकोत्तर १२८ वे वर्ष आहे. महाराष्ट्रातील प्रमुख गणेशोत्सवातील शंभर वर्षे पूर्ण करणारे हे गणेश मंडळ आहे. मानाचा गणपती म्हणून ह्या गणपतीची ख्याती आहे. लोकमान्य टिळकांनी १८९३ साली कसबा पेठेतील गणपतीची स्थापना करून गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्यानंतर ४ वर्षांनी म्हणजेच १८९८ साली जव्हार संस्थांचे नरेश यशवंतराव मुकणे (राजे) यांनी जव्हारमध्ये हा उत्सव थाटामाटात सुरू केला. यावर्षी मंडळाचे अध्यक्ष प्रसाद मेघपुरिया यांच्या नेतृत्वात उत्सव साजरा केला जात आहे.

नव्वदच्या दशकापासून उत्सवाला थोडीशी उतरती कळा लागली होती. महिलांनी उत्सव ताब्यात घेतला होता. नंतर, काही वर्ष हा उत्सव माघी गणेश उत्सव स्वरूपात साजरा करण्यात आला होता. त्याची स्थापना गांधी चौक येथे होत होती. तद्नंतर दिवंगत दिनेश भट यांचे तरुण नेतृत्व उत्सवाला लाभले आणि बघता बघता उत्सवाचे खूप मोठ्या स्वरूपात रूपांतर झाले. त्यावेळी त्यांच्या समवेत संदीप वैद्य,प्रशांत ओक,नवनीत जोशी, हर्षद मेघपुरीया,भरत बेंद्रे, अरविंद तंत्री,राजु अंभिरे, अविनाश काळे अजून बरेच युवा तरुण होते. लालबागच्या राजाचा जसा बोलबाला आहे.तो नवसाला पावतो तसाच येथील सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळ,जव्हार या ठिकाणी असलेल्या मयूरेश्वराचा देखील बोलबाला असल्याचे सांगण्यात येते.

१९९८ साली या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची शंभरी पूर्ण झाली. शंभर वर्षाचे कार्यक्रम साजरे करत असताना त्यामध्ये जव्हार अनिवासी जव्हारकर यांचे संमेलन भरवण्यात आले होते. ढोल ताशांचे पथक पहिल्यांदा जव्हारमध्ये आणले होते. या उत्सवात अबालवृद्ध व महिला अशांसाठी भरगच्च असे कार्यक्रम दहा दिवसात राबवण्यात येतात. वस्तू ओळखणे,स्मरणशक्ती,चमचा लिंबू,बुद्धी वाढणारे खेळ तर महिलांसाठी सुगरण कौशल्य, होम मिनिस्टर,बाई पण भारी देवासारखे महिलांसाठी कार्यक्रम तसेच पालघर जिल्हात व जव्हार परिसरात असामान्य अशी कामगिरी केलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान सोहळा कर्तृत्ववाचा झेंडा रोविला असा साजरा केला जातो. अशा विविध स्पर्धांनी भरलेला असा हा उत्सव त्यामध्ये मुलांच्या अंतर्गुणांना म्हणजेच नाच,नृत्य,गायन अभिनयाला देखील वाव मिळतो. अशा या उत्सवाला आजपर्यंत दिवंगत धर्मवीर आनंद दिघे तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वनगा,सावरा अश्या व्यक्तींनी देखील भेट दिली आहे.

उत्सवात आरोग्यासाठी साठी मोफत आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर आयोजित केली जातात. आजपर्यंत या उत्सवाला अनेक जिल्हा व तालुका स्तरीय पारितोषिक मिळालेली आहेत यंदा उत्सवाचे १२८ वे वर्षे साजरे होत असून या वर्षीचे अध्यक्ष प्रसाद मेघपुरिया आणि त्यांची कार्यकारणी ही देखील मेहतीने काम करत आहे.

यंदाचा मंडळाचा देखावा व सजावटीत हरिश्चंद्रगड हा महाराष्ट्रातील पश्चिम घाटातील एक प्राचीन आणि ऐतिहासिक किल्ला आहे. विशेषतः कोकणकडा आणि हरिश्चंद्रेश्वर मंदिर आणि केदारेश्वर मंदिर सारख्या महत्त्वाच्या ऐतिहासिक वास्तूंसाठी प्रसिद्ध आहे. मूळतः कलचुरी राजवंशाच्या काळात सहाव्या शतकातील,या किल्ल्यावर कदाचित ११ व्या शतकात कोरलेल्या गुहा आहेत. हरिश्चंद्रगडाचे चार खांब' म्हणजे केदारेश्वर मंदिरातील प्रतीकात्मक खांब आहेत,जे भगवान शिव यांना समर्पित आहे.हे खांब चार युग-वायू किंवा वैश्विक युगांचे प्रतिनिधित्व करतात असे मानले जाते.सत्य, त्रेता,द्वापार आणि कली.फक्त एक खांब उभा राहतो,इतर तीन पडले आहेत आणि एक सामान्य समजूत अशी आहे की,जर शेवटचा खांब तुटला तर जगाचा अंत होईल हे दाखवण्याचा छोटासा प्रयत्न या देखाव्या द्वारे करण्यात आला आहे.

# महालक्ष्मी यात्रेचे हुबेहूब चित्रण
## ठाकूरवाडीतील गणेशोत्सवात देखावा भाविकांचे आकर्षण

**डहाणू, दि. ३१ : प्रतिनिधी**



गणेशोत्सव हा भक्तिभाव, श्रद्धा आणि उत्साहाने साजरा होणारा सण, या पावन पर्वात प्रत्येक ठिकाणी गणपती बाप्पाची स्थापना होत असून आकर्षक सजावट व देखाव्यांनी भक्तांचे मन मोहून टाकले आहे. डहाणू तालुक्यातील नरपड ग्रामपंचायत हद्दीतील ठाकूरवाडी येथे श्री. कै. गोविंद हरी ठाकूर समाज मंदिर मंडळातर्फे उभारण्यात आलेला देखावा भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे.

या मंडळाने सात दिवसांच्या गणेशोत्सवासाठी उभारलेल्या देखाव्यात डहाणू तालुक्यातील सुप्रसिद्ध महालक्ष्मी माता मंदिर, विवळवेढे येथे चैत्र शुद्ध पौर्णिमेला भरविण्यात येणाऱ्या महालक्ष्मी यात्रेचे व परिसराचे हुबेहूब चित्रण केले आहे. यात्रेत दिसणारे आकाशपाळणा, चक्री, मौत का कुआ, जहाज पाळणा यांसारखे खेळण्याचे उपक्रम, मंदिर परिसर, डोंगर-दऱ्या, नदी, झाडे, गावातील लोकवस्ती व घरे यांचे वास्तवदर्शी चित्रण या देखाव्यात करण्यात आले आहे. दर्शनार्थी भाविकांनी हा देखावा पाहताना जणू ते प्रत्यक्ष महालक्ष्मी यात्रेतच सहभागी झाले असल्याचा अनुभव व्यक्त केला आहे. गडाकडे जाणारा प्रवेशद्वार, मुसळ्या डोंगराचा माथा व त्यावरील झेंडा, मंदिर व मंदिराचे प्रवेशद्वार यांचे सूक्ष्म रेखाटन करण्यात आले आहे. यात्रेत दिसणाऱ्या कारवीपासून उभारलेल्या झोपड्या, दुकाने, संगीताचे सूर व ग्राहकांना आकर्षित करणाऱ्या घोषणा देखील या कलाकृतीत समाविष्ट करण्यात आल्या आहेत. यामुळे यात्रेचे वातावरण अगदी प्रत्यक्ष उभे राहिल्याचा भास होतो.

या देखाव्याची खरी वैशिष्ट्ये म्हणजे ठाकूरवाडीतील स्वप्नील ठाकूर व विरेंद्र ठाकूर या तरुणांनी स्वतःच्या कल्पकतेतून आणि मेहनतीतून उभारला आहे. सायकलच्या गोलाकार लोखंडी रिंगांपासून आकाशपाळणा तयार करून त्याला रंगीबेरंगी दिव्यांची सजावट देण्यात आली आहे. तसेच, लाकडांच्या सहाय्याने 'मौत का कुआ' तयार करून त्यामध्ये लहान दुचाकी आणि कार फिरताना दिसतात. हे दृश्य पाहून भाविक थक्क होत आहेत. या अद्वितीय व आकर्षक कलाकृतीमुळे ठाकूरवाडीतील गणेशोत्सवाला विशेष ओळख मिळाली आहे. भाविकांसोबतच सर्व स्तरांतून या तरुणांचे कौतुक होत आहे. त्यांच्या कल्पकतेमुळे व परिश्रमामुळे गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणित झाला असून परिसरात भक्ती, आनंद आणि उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळत असल्याचे भाविकांकडून सांगण्यात येत आहे.

## ओबीसीमधून मराठ्यांना आरक्षण द्यावे की नाही? उदय सामंतांचा शरद पवारांना थेट सवाल

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

शरद पवारांनी तामिळनाडू येथील ७२ टक्के आरक्षणाचा दाखला देत घटनादुरूस्तीच्या माध्यमातून मराठ्यांना आरक्षण देण्याबाबत केलेल्या विधानाबद्दल उदय समंत यांना प्रश्न विचारण्यात आला, त्यावर ते म्हणाले की, "केंद्र सरकारकडून घटनेमध्ये बदल करून काही करायचे असेल, लोकसभेमध्ये काही ठराव घालायचे असतील तर त्यासाठी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार पुढाकार घेतील. पण माझ्या प्रश्नाचं उत्तरच कोणी देत नाही, शरद पवारांनी देखील सांगितले पाहिजे की ओबीसीच्या आरक्षणातून मराठा समाजाला आरक्षण द्यायचं की नाही, याचं कारण असं आहे की मनोज जरांगे यांची भूमिका आहे की ओबीसीमधून आरक्षण दिलं पाहिजे. पण ओबीसीमधून आरक्षण देताना मराठा समाज त्यामध्ये बसणार आहे का? किंवा बसवावा का? याचे उत्तर कोणीच देत नाही. सर्वजण राजकीय वक्तव्य करत आहेत. मनोज जरांगे यांच्या गर्दीकडे बघून स्वतःच्या विजयाचे आराखडे मांडत आहेत.


## आज का अंदाज

सोमवार १ सप्टेंबर २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 5 | 6 | 9 |
| 141 | 690 | 790 | 234 |
| 390 | 780 | 600 | 379 |
| 200 | 500 | 457 | 478 |
| 21 | 51 | 60 | 90 |
| 24 | 54 | 68 | 98 |
| 23 | 53 | 67 | 97 |

मुंबई बाजार

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 4 | 5 | 8 |
| 120 | 167 | 456 | 189 |
| 300 | 356 | 357 | 279 |
| 229 | 220 | 258 | 369 |
| 31 | 41 | 59 | 89 |
| 32 | 42 | 57 | 87 |
| 33 | 44 | 55 | 88 |

१ सप्टेंबर २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 02 | 12 | 46 | 73 |
| 05 | 15 | 49 | 76 |
| 08 | 18 | 43 | 79 |

सर्व बाजारांसाठी सिंगल अंक
ओपन टू क्लोज
8 9 0 1 2

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


## रिद्धिमा पंडितची लताच्या रूपात ग्लॅमरस एंट्री

**मुंबई, ३१ ऑगस्ट :** सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मध्ये नवीन दमदार एंट्रीमुळे कथेतील रोमांच वाढला असून युग (शब्बीर अहलूवालिया) आणि कैरी (आशी सिंह) यांच्या विश्वातदेखील खळबळ माजली आहे. अभिनेत्री ऋद्धिमा पंडित लताच्या भूमिकेत मालिकेत दाखल होत आहे. ही अशी व्यक्तिरेखा आहे जिला एक भूतकाळ आहे आणि जिच्या मोहक अदांमध्ये आणि रहस्यमयतेत मित्र आणि शत्रू यांच्यातील रेष धूसर होते.

लता काही या कथानकातील साधेसुधे पात्र नाही. ती आकर्षक, ठरेल आणि मोहक आहे. आपल्या आधुनिक शैलीने आणि सौंदर्याने ती लोकांचे लक्ष वेधून घेते आणि त्यांच्या नकळत त्यांना मुग्ध करते. वरवर पाहता ती उमद्या स्वभावाची आणि संभाषण-चतुर आहे. पण त्याच्या मागे तिचे चलाख डोके आहे. लोकांच्या मनाचा ती बरोबर अंदाज घेते. समोरच्याची दुखरी बाजू ओळखून आपल्या फायद्यानुसार तिला गोष्टी वळवता येतात. तिच्या भावनिक बुद्धीमत्तेत तिची ताकद दडलेली आहे. समोरच्याच्या नकळत ती त्याच्यावर ताबा मिळवते.

आपल्या भूमिकेविषयी बोलताना ऋद्धिमा पंडित म्हणते, लताची भूमिका स्वीकारताना मला तिच्या स्वभावातील गुंतागुंत फार आवडली होती. ती सुंदर आणि ग्लॅमरस आहे पण तिची खरी ओळख ही नाही. ती बोलण्यात हुशार, चलाख आहे आणि स्वतःचा फायदा कसा करून घ्यावा हे तिला बरोबर समजते. तिच्या स्वभावाचा अंदाज बांधणे कठीण आहे. कधी ती फटकळ वाटते तर कधी फारच मोहक वाटते. त्यामुळे तिच्याबाबतीत तुम्हाला बेसावध राहून चालत नाही. एक अभिनेत्री म्हणून लालित्य आणि धोका यामधील बारीक रेषेवर चालणारी व्यक्तिरेखा साकारणे थरारक आहे. लता नक्कीच युग आणि कैरीच्या जीवनात खळबळ माजवणार आहे. प्रेक्षकांना नक्कीच तिची कहाणी जाणून घेण्याची उत्सुकता वाटेल.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस खूप व्यस्त राहणार आहे. आज तुम्ही तुमच्या व्यवसायात काही बदल करण्याची योजना आखाल, ज्यामुळे तुम्हाला भविष्यात चांगले फायदे मिळतील.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. आज तुम्हाला नोकरीत नवीन संधी मिळतील, ज्याचा फायदा घेऊन तुम्ही तुमचा व्यवसाय वाढवू शकता. आज कामासाठी खूप धावपळ होईल.

**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. आज तुमची आवश्यक आणि महत्त्वाची कामे पूर्ण होतील, ज्यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. आज दुकान किंवा घराशी संबंधित काम सुरू करू शकता.

**कर्क :** आज तुम्ही मित्रांसोबत पिकनिकला जाऊ शकता, तुम्हाला त्याचा आनंद मिळेल. घरासाठी आरामदायी वस्तूंची खरेदी होईल. सहकाजयांच्या मदतीने सर्व कामे पूर्ण होतील.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज तुम्ही तुमच्या वडिलांशी काही कामाबद्दल बोलाल, ज्यामध्ये ते तुम्हाला पूर्ण सहकार्य करतील. आज कौटुंबिक जबाबदाजया पूर्ण कराल.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला असेल. आज तुम्ही तुमचे काम उत्तम पद्धतीने कराल, ज्यामुळे बॉस तुमची प्रशंसा करतील. आज तुमचे नोकरीशी संबंधित काम यशस्वी होईल.

**तूळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. आज ऑफिसमध्ये तुमच्या कामगिरीचे कौतुक केले जाईल आणि कनिष्ठ कर्मचारीही तुमच्याकडून शिकण्याचा प्रयत्न करतील.

**वृश्चिक :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला असेल. आज तुम्ही संपूर्ण दिवसासाठी एक ध्येय ठेवून काम कराल, ज्यामुळे तुमचे बहुतेक काम पूर्ण होईल. आज सार्वजनिक क्षेत्रात तुमची प्रतिमा चांगली असेल.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. आज तुमचे व्यावसायिक व्यवहार सुरळीत सुरू राहतील आणि तुमचे व्यावसायिक संबंधही मजबूत होतील. आज उत्पन्नासोबतच तुमचे खर्चही वाढतील.

**मकर :** आज तुम्ही नवीन योजनांबाबत खूप उत्साहित असाल. आज तुम्ही कौटुंबिक आणि सामाजिक उपक्रमांमध्येही योगदान द्याल. तुमची आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**कुंभ :** आज तुम्हाला व्यवसायातील प्रलंबित काम पूर्ण करण्यात यश मिळू शकते, ज्यामुळे तुम्ही इतर कामांचे नियोजन देखील कराल. नातेवाईकाच्या आगमनामुळे घरातील वातावरण आनंदी असेल.

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज तुम्ही तुमचे जीवन योग्य दिशेने घेऊन जाल आणि लवकरच तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. आज वडीलधाजयांचा सहवास मिळेल.

## शब्दकोडे क्रमांक २२०७



**आडवे शब्द :-**
१) काडीमोड, विवाहविच्छेद करणे, (वा. प्र.)
५) निर्लज्ज
९) पोपट
१०) करवत
११) मृत्युदेवता
१३) पहिला ऋतू
१५) भ्रणाची सावली
१८) हृदय
१९) घरोघरी प्याले जाणारे एक पेय
२०) नमन
२१) प्रयत्न
२३) ढग
२५) ममता, प्रेम
२७) अंत:करण
२८) क्षमा मागणारा
३०) तेजाब चित्रपटातील पाढ्यांचे गीत
३३) दशानन
३५) कासवाची पाठ
३६) कुबेराचा सेवक
३७) एक कोल्हापुरी दागिना
३९) ताडाच्या झाडाचा बुंधा
४१) प्रार्थना, उपासना
४३) हात व पंजा यांना जोडणारा अवयव
४५) मायापाश नसलेला, एकटा
४६) अग्रलेख लिहिणारा
४७) पवित्र, शुद्ध
५०) गाय
५१) मोठी टोपली
५२) पचेल असे खोटे कारण
५६) द्रव्य
५८) चौक
५९) मद्य, दारू, पश्चिम दिशा
६०) स्वत:ला
६१) अवस्था, स्थिती
६२) दिवस
६३) मुक्काम
६४) मेहुणा
६५) पंख
६६) सदन
६७) दया
६८) मनाला वाटणारी अशाश्वततेची भीती
७०) रचणे, रचण्याची मजुरी
७२) राज्य
७३) अर्णव, समुद्र
७४) प्रजा

**उभे शब्द :-**
१) पदर
२) लग्नानंतरची मिरवणूक
३) लबाडीचा हेतू
४) शहर
५) आकार नसलेला
६) संगीतातील एक राग
७) सीता पती
८) संध्याकाळ
१२) मुंबईचा घरगडी
१४) लोकसभा
१५) पार्वती, आदिमाया
१६) अरण्य
१७) दुतोंडी चर्मवाद्य
२२) खानेसुमारी
२३) लांबचे नातेसंबंध
२४) रोगाची पूर्वचिन्हे दिसू लागणे
२६) मागणारा
२९) केर
३०) सर्व प्रकारची दु:खे
३१) धागा
३२) पती, यजमान
३४) छाती
३७) छोटी ताटली
३८) सृष्टी, विश्व
४०) डफावर गाणे म्हणणारा
४१) जाळ, ज्वाला, दाह
४२) हादरा
४३) कामदेव
४४) डाक
४५) वर्ष, साल
४८) अरण्यवास
४९) वरचा भाग
५१) दरोडा
५२) नवनीत
५३) कमळाचे तळे
५४) सैल
५५) स्वत:च्या जवळचा
५७) बाजेची कापडी पट्टी
५८) विड्याची पाने तोडण्याचे एक वाकडे हत्यार
६३) शेत, जाणे-येणे, राबता
६४) सात्विक वृत्तिचा, पुण्यात्मा पुरुष
६५) पुन्हा
६६) मोठा हातोडा
६८) जरब, भीती
६९) हात
७१) परमेश्वर

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# पाचव्या दिवशी पाचशेहून अधिक गणेशमूर्ती संकलित





**नाशिक ।** गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून गोदावरी गटारीकरण विरोधी मंच आणि विविध स्वयंसेवी पर्यावरणपूरक संस्था, नाशिक महानगरपालिकेच्या सहकार्याने गणेशोत्सव काळात गोदावरी नदी प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी विशेष उपक्रम राबवत आहेत.

यंदाही गणेशोत्सवाच्या पाचव्या दिवशी चोपडा लॉन्स परिसरात कृत्रिम तलाव तयार करून गणेशमूर्ती संकलनाचे आयोजन करण्यात आले. "वाचवू या भगवान" या घोषवाक्यासह भ-भूमी,ग - गगन, वा-वायू, न-नदी यांचे जतन करून

## गोदावरी गटारीकरण विरोधी मंचाचा उपक्रम

पर्यावरण रक्षणाचा संदेश यावेळी देण्यात आला. आयोजकांनी सांगितले की, भौतिक सुखाच्या हव्यासापायी मानव निसर्गाचा ऱ्हास करत असून त्यामुळे सजीवांचे आयुष्यमान कमी होत चालले आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी प्रत्येकाने पुढे येणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. या उपक्रमात यंदा जवळपास पाचशेहून अधिक गणेशमूर्ती संकलित करण्यात आल्या. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात निर्माल्यही गोळा करण्यात आले. गोदावरी नदीसह नंदिनी, वरुणा, कपिला व वालदेवी या उपनद्यांचे प्रदूषण रोखणे आणि प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी घालावी, या मागण्यांबाबत भाविकांचे प्रबोधन करण्यात आले. नाशिककरांनीही या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद देत स्वयंसेवकांकडे मूर्ती जमा केल्या किंवा स्वतःहून कृत्रिम तलावात विसर्जित केल्या.

यावेळी निशिकांत पगारे, सुनिल परदेशी, प्रा. सोमनाथ मुठाळ, योगेश बर्वे, उदय थोरात, यशवंत नाशिककर, श्रद्धा दुसाने, आरती अहिरे, रुपाली तांबोरे, स्पर्श बत्तासे, रोहिणी कुमावत, दिल्ली पब्लिक स्कूलच्या गुंजन शर्मा, अनुजा टी, सुप्रिती बी., एचपीटी महाविद्यालयाचे प्रा. मनोज गिरम, जयकृष्ण देवरे, लकीकुमार सिंग, निखिल राय, अतिश यादव, राधिका बलायार, नम्रता जाधव, कनिष्का शर्मा, आशु पंडित, वेदांत तिवारी, कल्पेश अनकईकर, गणेश भिवरकर, गिरीश गांगुर्डे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### मनोज जरांगे पाटील यांची डॉ. विलास पांगारकर यांनी घेतली भेट




**नाशिक ।** संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील मराठा समाजाला आरक्षणासह इतर मागण्यासाठी उपोषण करत आहे. त्याच्या समर्थनासाठी नाशकातील हजारो मराठा बांधव तरुण रेल्वे, बस, खासगी वाहनाने मुंबईकडे रवाना झाले आहे. जोपर्यंत आरक्षण मिळणार नाही, तोपर्यंत माघार घेतली जाणार नसल्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. काल सकल मराठा समाज नाशिक, छावा मराठा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. विलासभाऊ पांगारकर यांनी आझाद मैदान येथे जरांगे पाटील याची भेट घेत चर्चा केली. यावेळी शिवसेनेचे उद्धव ठाकरे गटाचे विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आदी उपस्थित होते.

### एक भाकरी समाज बांधवांसाठी

मराठा आरक्षणाच्या लढ्यासाठी मुंबई येथे आंदोलनाला बसलेले मनोज जरांगे पाटील त्याच प्रमाणे महाराष्ट्रातून लाखोच्या संख्येने मुंबईत दाखल झालेल्या मराठा बांधवासाठी पांगरी, वावीसह सिन्नर तालुक्यातून भाकरी व चटणी सोमवारी (दि १) नेण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व समाज बांधवांनी आपल्या परीने भाकरी चटणी हरिबाबा मंदिर पांगरी येथे सोमवारी सकाळी आठ वाजता आणून देवून मराठा बांधवांसाठी हातभार लावावा. त्याच प्रमाणे नाशिक जिल्ह्यातून जी काही मदत लागेल ती करण्यात येईल.

**- डॉ. विलासभाऊ पांगारकर, सकल मराठा समाज नाशिक, छावा मराठा संघटना प्रदेशाध्यक्ष, छावा भारत क्रांती मिशन राष्ट्रीय अध्यक्ष**

## शेतकरी कर्जमुक्ती मेळाव्याचे आ. दिलीप बोरसे यांना निवेदन

**नाशिक ।** ओझर येथे होणाऱ्या शेतकरी कर्जमुक्ती मेळाव्याचे निवेदन व निमंत्रण बागलाणचे आमदार दिलीप बोरसे यांना आज सटाणा येथे जाऊन त्यांच्या कार्यालयात देण्यात आले.



यावेळी शेतकरी समन्वय समितीचे राज्य अध्यक्ष भगवान बोराडे, मोती नाना, कैलास बोरसे 938 आदिवासी कार्यकारी सहकारी संस्थेचे राज्य अध्यक्ष, दिलीप पाटील यांच्यासह मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ व्हावे व नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांवरील नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेचे बँकेची कारवाई थांबवावी या मागणीसाठी एक जून 2023 पासून 820 दिवसापासून नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू आहे याच आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर नाशिक ओझर येथे शरद जोशी जन्मशताब्दी दिनानिमित्ताने दोन दिवसाचे ३ आणि ४ सप्टेंबर रोजी शेतकरी अधिवेशनघेण्यात येणार आहे या अधिवेशनाचे व निमंत्रण नाशिक जिल्ह्यातील सर्वच विद्यमान आमदार खासदार मंत्र्यांना व आजी माझी आमदार खासदारांना देण्यात येणार आहे. बागलाणचे आमदार दिलीप बोरसे यांना निमंत्रण देण्यात आले, अशी माहिती भगवान बोराडे यांनी दिली. या अधिवेशनासाठी सर्व शेतकरी संघटनेच्या प्रतिनिधींना बोलविण्यात आलेले आहे.

## साधना एज्युकेशनच्या विद्यार्थ्यांची चमक जिल्हास्तरावर सुवर्णपदकाची कमाई




इंग्लिश मिडीयम स्कूल, नाशिक येथील विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेचा गौरव वाढविताना प्रतिष्ठित जिल्हास्तरीय वुशु स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. ही स्पर्धा शुक्रवारी पार पडली.

या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून विभागीय स्तरावरील या तेजस्वी विजेत्या कु. श्रद्धा मानकर, कु. दिव्या शिरसाठ यांनी १४ वर्ष आतील मुलींमध्ये सुवर्णपदक व कु.समृद्धी कस्तुरे यांनी १९ वर्षे आतील मुलींमध्ये सुवर्णपदक पटकावले अपार मेहनत, शिस्तबद्ध सराव आणि दृढनिश्चय यांचे उत्तम प्रदर्शन केले.

## तिसरा जागतिक योग निद्रा उत्सव १४ सप्टेंबरला नाशिकमध्ये साजरा होणार

**नाशिक ।** पूज्य आनंदमूर्ति गुरुमां यांच्या मार्गदर्शनाखाली योग निद्राचा तिसरा जागतिक उत्सव या वर्षी (ता.१४) जगभरात साजरा केला जात आहे. हा उत्सव आता केवळ भारतापुरता सीमित राहिलेला नाही, तर भारतासोबतच ब्रिटन, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दुबई आदी देशात ५० पेक्षा जास्त शहरांमध्ये साजरा केला जात आहे. हजारो लोक एकाच दिवशी, एकाच वेळी, पूज्य गुरुमां यांच्या मार्गदर्शनाखाली योग निद्राचा अनुभव घेतील. नाशिकमध्ये श्री शंकराचार्य संकुल, जुना गंगापूर नाका, गंगापूर रोड येथे सकाळी ११:०० वाजता हा कार्यक्रम होईल. ऋषी चैतन्य व्हिजन, नाशिक येथून ही माहीती देण्यात आली.



योग निद्रा, ज्याला अनेकदा योगिक निद्रा असे म्हटले जाते, हा एक प्राचीन सराव आहे, ज्यात पूर्ण शिथिलतेसह सजग राहण्याचे मार्गदर्शन दिले जाते. पूज्य आनंदमूर्ति गुरुमां यांनी हा सराव आधुनिक जीवनाच्या गरजेसाठी पुनर्जीवित केला आहे आणि सर्वांसाठी सुलभ केला आहे. हा सराव शरीराला गहन विश्रांती, मनाला शांती आणि स्पष्टता, तसेच भावनांना संतुलन प्रदान करतो. तणाव, नैराश्य आणि चिंता कमी करण्यासाठी हा अत्यंत प्रभावी आहे. याची मदत आंतरिक जागरूकता आणि एकूण कल्याण वाढविण्यातही होते. योग निद्राच्या प्रभावाला वैज्ञानिक आधार मिळाला आहे.

**नियमित योग निद्राच्या सरावाने स्मरणशक्ती तीक्ष्ण होते**

आयसीएमआर, हैदराबादच्या राष्ट्रीय पोषण संस्थेत सात डॉक्टरांच्या टीमने, ऋषि चैतन्य ट्रस्टच्या सहकार्याने केलेल्या पायलट अभ्यासात असे आढळले की, नियमित योग निद्राच्या सरावाने रक्तदाब नियंत्रित राहतो, स्मरणशक्ती तीक्ष्ण होते, मानसिक आरोग्य सुधारते आणि कॉर्टिसोल व ट्रायग्लिसराइड्स सारख्या हानिकारक घटकांचे प्रमाण कमी होते. गेल्या दोन वर्षांत योग निद्रा भारतात राष्ट्रीय स्तरावर साजरी केली जात होती. २०२४ मध्ये हा उत्सव जागतिक स्तरावर पोहोचला, ज्यात जगभरातील लोक सहभागी झाले. योग निद्राच्या वाढत्या लोकप्रियतेचे आणि पांतरकारी शक्तीचे हे प्रमाण आहे. गुरुमांजींच्या योग निद्रा या ध्यानाचा यूट्यूबवर १० दशलक्ष लोक सराव करतात. १४ सप्टेंबर २०२५ रोजी पुन्हा एकदा जग सामूहिक अंतर्यात्रिसाठी थांबणार आहे. विश्रांती, गहन शिथिलता आणि आतल्या शांततेचा अनुभव घेण्याचा क्षण. जागतिक योग निद्रा उत्सव फक्त एक कार्यक्रम नाही, तर पूज्य आनंदमूर्ति गुरुमां यांच्या प्रेरणेतून सुरू झालेला आंतरिक जागरणाचा एक आंदोलन आहे.

## नाशिक गणेश दर्शन...


आर्वी मच्छिंद्र साळुंके, विंचूर


सपना ततार


दीपाली निफाडकर


सारीका भोर


सुजाता वाकचौरे


### गणेश दर्शनासाठी गर्दी सुरू


**नाशिक ।** गणेशोत्सव सुरू होऊन चार दिवस लोटले आहेत. आता गणेशोत्सव रंगात येऊ लागला आहे. नागरिक आरास, देखावे बघण्यासाठी घराबाहेर पडू लागले आहेत. यंदा धार्मिक, पौराणिक आणि प्रबोधनात्मक देखावे भरपूर प्रमाणात आहेत. संध्याकाळचे वेळेस देखावे आरास बघण्यासाठी भाविकांची गर्दी होताना दिसून येत आहे. पावसाने काही काळ उघडीप दिल्याने नागरिकांचा उत्साह वाढलेला दिसून येत आहे.


स्नेहल पाटील


सारिका रमेश चव्हाण, विंचूर


स्नेहल सावरगावकर


मोहिनी नंदन


प्रिती जाधव, सुवर्णा जाधव, शार्वी जाधव

# उंच कुटुंबाची वार्षिक कमाई ८२ कोटी रुपये!

मुलांची उंची त्यांच्या आई-वडीलांच्या उंचीवर अवलंबून असते; परंतु काही प्रकरणात मुलांची उंची आई-वडीलांपेक्षा जास्त उंच असते; परंतु अमेरिकेतील एका कुटुंबातील सर्वांची उंची अगदी ताडामाडासारखी आहे. या कुटुंबातील सर्वच लोक सहा फुटांपेक्षा जास्त उंच आहेत. यामुळे या कुटुंबाला सहा फुटी परिवार असे म्हटले जाते. हे लोक दरवर्षी ८२ कोटी रुपये कमावतात. यांच्या कमाईची पद्धतही आश्चर्यकारक आहे.

अमेरिकेच्या फ्लोरिडा येथे राहणारे टेमारा कुटुंब अलिकडे 'सोशल मीडिया'वर 'सर्वात उंच कुटुंब' म्हणून गाजत आहे. या कुटुंबातील सदस्यांची उंची ६ फूट ३ इंचापासून ते ६ फूट १० इंचापर्यंत आहे. हेच त्यांच्या प्रसिद्धीचे आणि कमाईचे साधन बनले आहे. या कुटुंबातील सर्वात चर्चित व्यक्ती ६ फूट २ इंच उंचीची मारी टेमारा आहे. तिचे इंस्टाग्रामवर ३० लाखाहून अधिक फॉलोअर्स आहेत आणि वार्षिक सुमारे १० मिलियन डॉलर (सुमारे ८२ कोटी) कमाई आहे; परंतु मारी कुटुंबातील सर्वात उंच नाही, तर तिचा मोठा भाऊ ट्रॉयची उंची ६ फूट १० इंच आहे. शेनची उंची ६ फूट ९ इंच आहे. दोन्ही बास्केटबॉल खेळाडू राहिले आहेत आणि कमाईमध्ये एकमेकांचे प्रतिस्पर्धी आहेत. ट्रॉय वर्षाला एक लाख डॉलर तर शेन ५० हजार डॉलर कमावत आहे.



मारी हीची आई क्रिस्टीन (६३ वर्ष, उंची ६ फूट ५ इंच) ही आधी इमर्जन्सी ऑपरेटर म्हणून काम करायची. आता पुरुषांच्या बुटांचे (युके साईज १३) फोटो विकून चांगली कमाई करते. मारीचे वडील मायकल (६५ वर्ष, उंची ६ फूट ३ इंच) आधी इलेक्ट्रीशियन होते. आता कुटुंबाच्या कंटेंट प्रोजेक्टमध्ये सहभागी होऊन वर्षाला ५० हजार डॉलर कमावत आहेत. मारी म्हणते की त्यांचे बालपण आर्थिकदृष्ट्या खडतर होते. आई-वडीलांनी नेहमीच मुलांच्या गरजांना प्राधान्य दिले; परंतु स्वत:साठी कधी जास्त पैसे खर्च केले नाही. त्यामुळे त्यांना आता आर्थिकदृष्ट्या सुरक्षित कुटुंबाला पाहून सर्वाधिक आनंद वाटतो आहे. सुमारे चार वर्षांपूर्वी मारीने तिची एक लाख डॉलर वार्षिक पगाराची नोकरी सोडून 'ओन्ली फॅन्स' वर काम सुरू केले. सुरुवातीला ती एकटी व्हिडीओ तयार करायची; परंतु आई-वडील आणि भाऊ नेहमीच बॅकग्राऊंडला दिसायचे कवा मदत करायचे.

हळूहळू मारीने त्यांनाही छोट्या-छोट्या स्किट्समध्ये सामील करणे सुरू केले. सर्वांनी त्यासाठी विनातक्रार तयारी दाखवली. आईला हे मजेदार वाटले तर वडीलांना हसू आले. भावांनी आव्हान म्हणून हे स्वीकारले. पहिल्या व्हिडीओत कुटुंबाने आपल्या उंचीची तुलना करत सर्वात उंच ते सर्वात छोटे असे ओळीने उभे राहत पोझ दिली. त्यांची उंची जास्त असल्याने सर्वसाधारण फर्निचर त्यांना कसे पुरेसे पुरत नाही असे दाखवले. आता हे कुटुंब 'टॉल फॅमिली ऑनलाईन' नावाने प्रसिद्ध आहेत. उंचावर ठेवलेली एखादी वस्तू सहज काढणे, दरवाजाच्या चौकटीला धडकणे, छोट्या कारमध्ये बसताना येणारी अडचण, या शिवाय डान्स, प्रँक्स आणि रोजचे अनुभव त्यांच्याद्वारे मजेदार अंदाजात सादर केले जातात.

# कॅलिडोस्कोप



# तो बनला ८०० मुलांचा पिता

१०० वर्षांच्या दिएगोने आपल्या नामशेष होणाऱ्या प्रजातीला वाचवलं आहे. दिएगो एक, दोन नाही तर तब्बल ८०० मुलांचा पिता आहे. आता हा दिएगो माणूस नाही तर कासव आहे. या कासवाचं वजन ८० किलो आहे. १०० वर्षांचा दिएगो हे 'चेलोनोएडिस हूडेनसिस' नामक प्रजातीचं कासव आहे. ही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर होती. जवळपास ५० वर्षांपूर्वी या प्रजातीची दोन नर तर १२ मादी कासवं उरली होती. त्यामुळे काही दिवसातच या प्रजातीचं अस्तित्व संपेल, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. ही कासवं गालापोगास बेटांवरच्या भल्या मोठ्या परिसरात रहात होती. त्यामुळे त्यांची संख्या वाढत नव्हती. म्हणूनच दिएगो आणि इतर कासवांना १९६५ मध्ये कॅप्टिव्ह ब्रिडग कार्यक्रमाअंतर्गत दक्षिण कॅलिफॉर्नियातल्या सांताक्रूज आयलंड प्राणी संग्रहालयात आणण्यात आलं होतं. दिएगोला बारा मादी कासवांसोबत ठेवण्यात आलं होतं. या काळात या कासवांची संख्या २००० झाली. यात दिएगोने प्रमुख भूमिका बजावली. दिएगो यापैकी ८०० पिलांचा पिता बनला. दिएगो जवळपास पाच दशकं आपल्या प्रजातीची लोकसंख्या वाढवण्यासाठी झटला. त्यानंतर तो निवृत्त झाला आणि त्याची रवानगी पुन्हा पॅसिफिक महासागरातल्या गालापोगास बेटांवर करण्यात आली.

# 'चॅटजीपीटी'चा सल्ला पडला महाग




'सोशल मीडिया' आणि वाढत्या टेक्नॉलॉजीमुळे आजकाल लोकांकडून त्याचा वापर, त्यावर अवलंबून राहणे वाढले आहे. 'चॅटजीपीटी' आल्यापासून तर अनेकजण सर्रास त्याचा वापर करत असतात; मात्र त्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवून काहीही अवलंबणे जीवासाठी धोकादायक ठरू शकते. याचे एक ज्वलंत, जितेजागते उदाहरण समोर आले असून 'चॅटजीपीटी'चा सल्ला ऐकणे एका माणसाला इतके महागात पडले, की त्याची रवानगी थेट हॉस्पिटलमध्येच झाली.

खरे तर, 'चॅटजीपीटी'ने सुचवलेल्या डाएट प्लॅनचे पालन केल्यानंतर एका तरुणाला रुग्णालयात दाखल करावे लागले. डॉक्टरांचे म्हणणे आहे, की आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) शी संबंधित ब्रोमाइड विषबाधेची ही कदाचित पहिलीच घटना आहे. वॉशिंग्टन विद्यापीठातील डॉक्टरांनी 'नल्स ऑफ इंटरनल मेडिसिन: क्लिनिकल केसेस'मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालानुसार एका माणसाने त्याच्या आहारातून मीठ (सोडियम क्लोराईड) कमी करण्यासाठी 'चॅटजीपीटी'चा सल्ला घेतला. त्यानंतर 'चॅटजीपीटी' ने त्याला क्लोराईडऐवजी सोडियम ब्रोमाइड घेण्याचा सल्ला दिल्याचा आरोप आहे. त्या माणसाने तीन महिने हा सल्ला पाळला; पण त्यादरम्यान त्याची प्रकृती बिघडू लागली. त्याला पॅरानोईया आणि मतिभ्रम यासारख्या व्याधींची गंभीर लक्षणे जाणवू लागली आणि अखेर रुग्णालयात दाखल करावे लागले.

अखेर रुग्णालयात दाखल केल्यानंतर, जेव्हा त्याला रुग्णाला विचारण्यात आले, तेव्हा त्याने सांगितले, की त्याच्या आजाराचे कारण चॅटजीपीटी आहे, तेव्हा डॉक्टरांनी स्वतः 'चॅट जीपीटी'ला तोच प्रश्न विचारला आणि 'एआय'ने पुन्हा ब्रोमाइड हा पर्याय सुचवला; परंतु ते मानवी वापरासाठी असुरक्षित आहे. हे काही त्याने स्पष्ट केले नाही. यावरून असे दिसून येते की एआय संदर्भ न समजता माहिती देऊ शकते, जे अत्यंत धोकादायक आहे, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे; मात्र सुदैवाने तीन आठवड्यांच्या उपचारानंतर ती व्यक्ती पूर्णपणे बरी झाली. या घटनेनंतर, डॉक्टरांनी एक गंभीर इशारा दिला आहे. 'एआय टूल्स' वैज्ञानिक माहिती अधिक सुलभ करू शकतात; परंतु ते कोणत्याही परिस्थितीत व्यावसायिक वैद्यकीय सल्लयाची जागा घेऊ शकत नाहीत. आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये नेहमीच तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, कारण 'एआय' कधी कधी चुकीचे मार्गदर्शन देऊ शकते; जे घातक ठरू शकते, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

# कुठून आलं सोनं?

सोन्यासारख्या चमचमत्या धातूचं आकर्षण नसणारी व्यक्ती विरळाच! सोन्याचे दागिने, नाणी, विटा यांना प्रचंड मागणी असते. भारतात प्रचंड पैसा ओतून सोन्याची खरेदी केली जाते. इतर देशांमध्येही सोन्याची खरेदी होते. असा हा धातू कुठून आला, याच्या निर्मितीचं रहस्य काय, असे प्रश्न काहीजणांना पडतात. सोन्याची उत्पत्ती कशी झाली,



याबाबत बरेच तर्क लढवले जातात. पण सोनं अंतराळातून पृथ्वीवर आल्याचं काही संशोधकांचं म्हणणं आहे. पृथ्वीच्या पोटात दडलेलं सोनं अंतराळातून उल्कांच्या रुपात पृथ्वीवर आल्याचं संशोधक सांगतात. अर्थात याबाबतही मतंमतांतरं आहेत. पण शास्त्रज्ञांकडे याचे ठोस पुरावे असल्याचं म्हटलं जातं. सोनं अंतराळातून उल्कापडांच्या रुपात पृथ्वीवर आलं, असं जॉन एमस्ली या शास्त्रज्ञाचं म्हणणं आहे. सोनं अंतराळातून आल्याबाबत विविध तर्क लढवले जातात. १९७० मध्ये अपोलो यान चंद्रावर उतरलं. त्यानंतर अंतराळातून पृथ्वीवर झालेल्या उल्कावर्षावामुळे सोन्याची उत्पत्ती झाल्याचा दावा केला जाऊ लागला. याबाबत बरंच संशोधन करण्यात आलं आहे. त्यामुळे पृथ्वीवरचं सोनं ही अंतराळाची देणगी असल्याची बाब नाकारता येण्यासारखी नाही.

# प्रेयसीसाठी चोरला चंद्रावरचा दगड!

प्रेयसीसाठी चंद्र-तारे तोडून आणण्याचे आश्वासन प्रियकर आपल्या प्रेयसीला देत असतात. एका माणसाने हे वाक्य खरे करून दाखवले. त्याने त्याच्या प्रेयसाठीसाठी चक्क 'लूनर रॉक' म्हणजेच चंद्रावरचा दगड चोरून आणला, तोही 'नासा'च्या लॅबमध्ये घुसून. विशेष म्हणजे त्याने चोरलेल्या या लूनर रॉकची किमत २१ लाख डॉलर इतकी होती.

नासातून चंद्रावरील दगड चोरणाऱ्या माणसाचे नाव रॉबर्ट थॅड आहे. रॉबर्टने सांगितले, की तो नासामध्ये काम करणाऱ्या टिफनीवर प्रेम करत होता. रॉबर्ट तिच्या खूप प्रेमात होता, त्याला त्याच्या प्रेयसीसोबतचे नाते अधिक रोमँटिक बनवण्याची कल्पना सुचली आणि ती होती चंद्रावरील प्रणय. यासाठी त्याने एक योजना आखली.

रॉबर्टने नासाच्या प्रयोगशाळेत ठेवलेला चंद्राचा एक खडक चोरला. त्याने त्याची मैत्रीण टिफनी फाउलरलाही याबद्दल सांगितले. दोघांनी मिळून चंद्राचा तुकडा चोरण्याची योजना आखली.

अखेर चंद्रावरचा खडक चोरल्यानंतर रॉबर्टने घरी आणला आणि आपल्या बेडमध्ये लपवून ठेवला. नंतर त्याच बेडवर त्याने फाउलरसोबत प्रणय केला. रॉबर्ट म्हणतो, की यापेक्षा चांगले काहीही असू शकत नव्हते. कारण तो चंद्रावर रोमान्स करण्यासारखाच अनुभव होता असेही त्याने सांगितले. माजी नासा इंटर्न रॉबर्ट थॅड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चंद्रावरचा खडक चोरण्यासाठी सुरक्षा कॅमेरे पुन्हा डिझाइन केले.



त्यांनी निओप्रीन बॉडीसूट घातले आणि प्रयोगशाळेत प्रवेश मिळवण्यासाठी अधिकृत बॅजदेखील बनवले. या सर्व गोष्टींच्या मदतीने रॉबर्ट, फाउलर आणि त्यांच्या एका मित्राला १७ पौंड वजनाचा चंद्राचा दगड चोरण्यात यश आले.

'एफबीआय'च्या सांगण्यानुसार, मात्र त्या खरेदीदाराला त्या लूनर रॉकच्या स्रोताबद्दल संशय येताच त्याने एजन्सीला माहिती दिली. त्यानंतर 'एफबीआय'ने रॉबर्ट आणि त्याच्या साथीदारांना पकडण्यासाठी गुप्त कारवाई केली. अखेर रॉबर्टने आपला गुन्हा कबूल केला. या चोरीसाठी, गुन्ह्यासाठी त्याला आठ वर्षांची शिक्षा झाली, मात्र नंतर त्याला दोन वर्षं आधीच सोडून देण्यात आले तर फाऊल हिला दीडशे तासांच्या सामुदायिक सेवेची आणि नऊ हजार डॉलर्सच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

# प्लास्टिकचा असाही वापर




लाकडापासून विविध वस्तू तयार केल्या जातात. लाकडं मिळवण्यासाठी झाडांची कत्तल केली जाते. एकीकडे झाडं तोडली जात असताना पर्यावरणाला हानीकारक अशा प्लास्टिकचा वापर वाढत आहे. म्हणूनच कॅनडातल्या एका कंपनीने प्लास्टिकचा पुनर्वापर करून लाकडाला पर्यायी वस्तूची निर्मिती केली आहे. 'गुडवूड' असं या कंपनीचं नाव आहे. या वस्तूचा वापर इमारत बांधण्यासाठी केला जात आहे. यात खिळेही ठोकता येतात. लाकडाऐवजी या वस्तूचा वापर केला जाऊ शकतो. ही कंपनी कॅनडामधल्या नोवा स्कॉटिया प्रांतातल्या हॉलीफ्लॅक्स परिसरातल्या जवळपास ८० टक्के प्लास्टिकचा पुनर्वापर करते तर उर्वरित २० टक्के प्लास्टिक इतर कंपन्यांकडे पाठवलं जातं. यामुळे प्लास्टिकचं प्रमाण कमी होतं शिवाय लाकडाला पर्याय उपलब्ध झाल्यामुळे झाडं तोडली जात नाहीत. 'गुडवूड'च्या या शोधामुळे स्थानिकांसह इथलं प्रशासनही आनंदी आहे. प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवणं शक्य नाही. म्हणूनच प्लास्टिकचा पुनर्वापर करण्याचा पर्याय योग्य असल्याचं कंपनीचं म्हणणं आहे.

# असेही निकष देखणेपणाचे!

जगात सौंदर्याचे निकष प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे आहेत. एकीकडे सडपातळ शरीर आणि सिक्स-पॅक ॲब्सला सौंदर्याचे प्रतीक मानले जाते, तर दुसरीकडे इथियोपियातील बोडी जमातीमध्ये सुटलेले पोट आणि स्थूल शरीरच पुरुषांना सर्वात देखणे बनवते. बोडी जमातीमध्ये बाहेर निघालेले पोट आणि फुगलेले गाल केवळ पुरुषांना आकर्षक बनवत नाहीत, तर त्यांना लग्नासाठी सर्वात योग्य उमेदवारही बनवतात.

इथियोपियाच्या ओमो खोऱ्यात राहणारी बोडी जमात, जी मीन नावानेही ओळखली जाते, तिच्या अनोख्या सांस्कृतिक परंपरांसाठी प्रसिद्ध आहे. येथे दरवर्षी जूनमध्ये काएल समारंभ आयोजित केला जातो, जो जमातीचा नववर्ष उत्सव आहे. या समारंभाचे मुख्य आकर्षण आहे पुरुषांमधील सर्वात स्थूल होण्याची स्पर्धा. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक कुटुंब आपल्या घरातील अविवाहित पुरुषाची निवड करते. हा पुरुष पुढील सहा महिने विशेष आहार आणि जीवनशैलीचे पालन करतो. या काळात ते गायीचे रक्त आणि दूध यांचे मिश्रण सेवन करतात, ज्यामुळे त्यांचे वजन झपाट्याने वाढते.

या अनोख्या प्रक्रियेत पुरुषांना वेगळ्या झोपडीत सहा महिने रहावे लागते. या काळात त्यांना कोणतीही शारीरिक हालचाल करण्याची कवा लैंगिक संबंध ठेवण्याची परवानगी नसते. महिला आणि मुली त्यांच्यासाठी गायीचे ताजे रक्त आणि दूध आणतात. बोडी जमातीमध्ये गाय पवित्र मानली जाते. त्यामुळे अनोख्या पद्धतीने रक्त काढण्यात येते. नंतर मातीने ते बंद केले जातो; जेणेकरून गायीचा जीव वाचेल. हा आहार सेवन करणे सोपे नाही. उष्ण हवामानामुळे रक्त लवकर गोठते आणि स्पर्धकांना सकाळी-सकाळी दोन लिटर रक्त आणि दूधाचे मिश्रण त्वरित प्यावे लागते. अनेक पुरुष इतक्या प्रमाणात आहार पचवू शकत नाहीत आणि उलटी करतात. तरीही, जे या आव्हानाला पार करतात, ते काएल समारंभाच्या दिवशी आपले स्थूल शरीर प्रदर्शित करतात. या दिवशी पुरुष आपल्या शरीरावर माती आणि राख लावतात आणि शहामृगाच्या पंखांपासून बनवलेले दागिने घालतात. नंतर ते एका पवित्र झाडाभोवती तासनतास प्रदक्षिणा घालतात, जिथे जमातीचे इतर लोक आणि महिला त्यांचा उत्साह वाढवतात.

या स्पर्धेचा विजेता तो पुरुष ठरतो, ज्याचे पोट सर्वात मोठे असते. त्याला कोणतेही भौतिक बक्षीस मिळत नाही; पण तो आयुष्यभरासाठी जमातीचा नायक बनतो. बोडी जमातीच्या महिला मोठ्या पोटाच्या पुरुषांना अत्यंत आकर्षक मानतात आणि अशी समजूत आहे की त्या या पुरुषांशी लग्न करण्यासाठी उत्सुक असतात. समारंभानंतर, पुरुष सामान्य आहाराकडे परत येतात आणि काही आठवड्यांतच त्यांचे वाढलेले वजन कमी होते; पण त्यांची नायकाची प्रतिमा आयुष्यभर कायम राहते. बोडी जमातीमध्ये प्रत्येक मुलाचे स्वप्न असते की मोठे होऊन या स्पर्धेत सहभागी व्हावे आणि नायक बनावे.



## दैनिक महासागर प्रस्तुत 'आमचा लाडका गणेश'

दैनिक महासागर प्रस्तुत "आमचा लाडका गणेश" या सदरासाठी आपल्या घरगुती तसेच सार्वजनिक बाप्पांचे सुबक छायाचित्रे 9137362297 या क्रमांकावर पाठवावेत. चांगल्या छायाचित्रांना दैनिक महासागर मध्ये ठळकपणे प्रकाशित करण्यात येईल...



पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते भीमराव धुळप यांच्या कोपरखैरणे,नवी मुंबई येथील निवासस्थानी विराजमान झालेले सुवर्णमहोत्सवी वर्षातील धुळप परिवाराचे बाप्पा.



अनाथ्यांचा बाप्पा. अंबरनाथ.



श्री संजय बाबुराव शिंदे (बदलापूर) यांचा लाडका बाप्पा



माने परिवार चा राजा,वांद्रे पुर्व



श्री. विवेक श्रीधर उत्तेकर, नेरूळ यांच्या घरचा बाप्पा



श्री. शिवाजी शांताराम घाणेकर घाटकोपर यांचा फक्त पुठ्ठा आणि कागदाचा वापर करून इको फ्रेंडली सजावट केलेला बाप्पा.


# काँग्रेसच्या अधिवेशनात दंगल उसळली आणि संघ स्वयंसेवकांनी केली मदत, सरसंघचालकांनी सांगितला प्रसंग

नागपूर, दि. ३१ प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त 'संघाच्या प्रवासाची १०० वर्षे – न्यू होरायझन्स' या तीन दिवसांच्या शताब्दी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेच्या निमित्ताने आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सरसंघचालक मोहन भागवत यांनी आज विविध विषयांवर मते व्यक्त केले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ केवळ भाजपलाच मदत करतोय असा प्रश्न सरसंघचालकांना विचारण्यात आला यावर भागवत यांनी राजीव गांधी एनएसयूआयचे अध्यक्ष असतानाचा किस्सा सांगितला.

सरसंचालक डॉ. मोहन भागवत म्हणाले की, भारतरत्न दिवंगत राजीव गांधी एनएसयूआयचे राष्ट्रीय अध्यक्ष असताना नागपूरमध्ये त्यांचे अधिवेशन झाले होते. या अधिवेशनाला देशभरातून तीस हजारावर नागरिक उपस्थित झाले होते. एनएसयूआयच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर भांडण झाले होते. एकमेकांसोबत हाणामारी करण्यापर्यंत गोष्ट गेली होती. या स्वयंसेवकांसाठी जिथे जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. तिथेही मोठे भांडण झाले. एकमेकांच्या अंगावर जेवणाच्या थाळ्या फेकण्यापर्यंत प्रकरण केले होते. त्यामुळे अधिवेशनाची संपूर्ण व्यवस्था बिघडली होती.

व्यवस्था बिघडल्याने कार्यक्रमाचे आयोजक अस्वस्थ झाले होते. यावेळी काँग्रेसकडे काहीच उपाय नसल्याने शेवटी तत्कालीन काँग्रेसचे खासदार यांनी मला फोन केला. त्यावेळी मी संघाचा प्रचारक होतो. काँग्रेसचे अधिवेशनातील खानावळ सुरू करण्यासाठी स्वयंसेवकांची मदत मागितली. त्यांच्या अकरा खानावळी होत्या. ११ खानावळीपैकी आठ ठिकाणी आम्ही स्वयंसेवक पाठवले



आणि खानावळ सुरू करून दिली. त्यामुळे मदत करताना संघ कधीही पक्ष, जात, धर्मपंथ असा कुठलाही भेद करत नाही. जिथे जिथे आम्हाला मदत मागितली तिथे संघाचे स्वयंसेवक कायम उभे राहतात असे सरसंचालक मोहन भागवत यांनी सांगितले.

सरसंघचालक मोहन भागवत यांनी हिंदू सणांदरम्यान लोकांच्या भावनांचा आदर करण्यासाठी मांसविक्री मर्यादित ठेवण्यास समर्थन दिले, त्याच वेळी त्यांनी हेही स्पष्ट केले की, लोकांच्या खाण्याच्या सवयी हा कोणाचाही वैयक्तिक प्रश्न असू नये. भागवत म्हणाले, "अन्नपदार्थांचा धर्माशी संबंध नाही; पण उपवासाच्या दिवशी लोक त्याचे सेवन टाळतात. सणांदरम्यान शाकाहारी जेवण घेणे सामान्य आहे. अशा वेळी जर कोणी आपल्या घरासमोरच असे (मांस खाताना किंवा विकताना) दिसले, तर त्यांच्या भावना दुखावल्या जाण्याची शक्यता आहे. तो सण फक्त दोन-तीन दिवसांचा असतो. अशा वेळी सारासार विचार करून लोकांनी अशा गोष्टींपासून दूर राहायला हवे. कोणी काय खातो याने माझ्या भावना दुखावू नयेत; पण त्यांच्या भावनांचा आदर करणे चांगली गोष्ट आहे. भागवत यांनी संघाच्या ऐतिहासिक भूमिकेवर जोर दिला की, शाकाहाराला प्रोत्साहन देण्याच्या अजेंड्याशिवाय लोकांच्या भावनांचा आदर केला पाहिजे.



मराठा आरक्षण आंदोलनाचा आणि मनोज जरांगे पाटलांचा प्रभाव सीएसएमटी परिसरातील कपड्याच्या दुकानांवर सुद्धा पसरला आहे.

## बांधकाम साईटवर काम करणारा आदिवासी मुलगा झाला NEET परीक्षा उत्तीर्ण

भुवनेश्वर, दि. ३१ वृत्तसंस्था

ओडिशामील खुर्दा जिल्ह्यातील मुदुलिधिया गावातील शुभम सबर हा कुटुंबाचे पोट भरण्यासाठी बंगळुरूतील एका बांधकाम साईटवर काम करायला गेला. १४ जून रोजी तो नेहमीप्रमाणे साईटवर काम करत असताना त्याला ओडिशातून त्याच्या शिक्षकाचा फोन आला. शिक्षकांनी त्याला फोनवर सांगितले की, त्याने नीट परीक्षा उत्तीर्ण केली आहे. आदिवासी समाजातून पुढे येऊन कसेबसे शिक्षण घेणाऱ्या शुभमसाठी हा सुखद धक्का होता. नुकतेच त्याला ओडिशातील महाविद्यालयात प्रवेश मिळाला आहे, त्यानिमित्ताने याची पुन्हा चर्चा होत आहे. नीट परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे समजताच शुभम सबरने म्हटले की, ही आनंदाची बातमी ऐकल्यानंतर मी माझे अश्रू रोखू शकलो नाही. मी आई-वडिलांना सांगितले की, मी आता डॉक्टर होणार आहे. त्यानंतर मी आमच्या कंत्राटदाराला फोन करून सांगितले की, माझा हिशोब देऊन टाका मी निघायचे आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला १९ वर्षीय शुभर सबरला ओडिशाच्या बेरहमपूर मधील मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये प्रवेश मिळाला. शुभमने पहिल्याच प्रयत्नात अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून १८,२१२ वा क्रमांक मिळवला होता. शुभम आता चार वर्षांनी आपला अभ्यासक्रम पूर्ण करेल, तेव्हा तो त्यांच्या पंचायतीमधील डॉक्टर बनणारा पहिला व्यक्ती असणार आहे. शुभमचे वडील लहान शेतकरी आहेत. चार भावंडांमध्ये तो सर्वात मोठा आहे. आर्थिक चणचणीत अतिशय खडतर आयुष्य जगणाऱ्या शुभमचा प्रवास अनेक खाचखळग्यांनी व्यापलेला होता. याची जाणीव ठेवून आता तो वैद्यकीय शिक्षण घेण्यास सज्ज झाला आहे.

# अमांता हेल्थकेअरचा आयपीओ आज उघडणार

अमांता हेल्थकेअर लिमिटेड ही एक औषधनिर्माण कंपनी असून ती स्टेराईल लिक्विड उत्पादनांच्या विकास, उत्पादन आणि विपणन कार्यात गुंतलेली आहे. यामध्ये मोठ्या आणि लहान प्रमाणातील पॅरेंटरल्स (एलव्हीपीएस आणि एसव्हीपीएस) यांचा समावेश होतो. कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्रीचा (IPO) प्रस्ताव १ सप्टेंबर २०२५ रोजी सुरू करण्याचा आहे. वरील किंमत पट्टीनुसार १२,६00.00 लाख उभारण्याचे उद्दिष्ट असून, हे शेअर्स एनएसई आणि बीएसई या प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध केले जाणार आहेत.या इश्यूचा आकार प्रत्येकी रु.१० मूळ मूल्य असलेल्या १,00,00,000 इक्विटी शेअर्सपर्यंत आहे, ज्यासाठी प्रति शेअर किंमत पट्टी रु.१२० ते १२६




अशी आहे.इक्विटी शेअर वाटप पात्र संस्थागत गुंतवणूकदार –५0,00,000 इक्विटी शेअर्सपेक्षा जास्त नसेल. बिगर-संस्थागत गुंतवणूकदार किमान १५,00,000 इक्विटी शेअर्स तर वैयक्तिक गुंतवणूकदार किमान ३५,00,000 इक्विटी शेअर्स पर्यंत शेअर्स खरेदी करू शकतात.

या आयपीओमधून मिळणाऱ्या निव्वळ निधीचा वापर हरियाळा, खेड़ा, गुजरात येथील स्टेरीपोर्टच्या नवीन उत्पादन युनिटसाठी नागरी बांधकामाच्या कामासाठी आणि उपकरणे, यंत्रसामग्री आणि प्लांट खरेदीसाठी आवश्यक भांडवली खर्च भागवण्यासाठी केला जाईल. तसेच, हरियाळा, खेड़ा, गुजरात येथील एसव्हीपी च्या नवीन उत्पादन युनिटसाठी नागरी बांधकाम, उपकरणे, यंत्रसामग्री आणि प्लांट खरेदीसाठी भांडवली खर्च भागवण्यासाठी आणि सामान्य कॉर्पोरेट गरजांसाठी वापरण्यात येईल. अँकर गुंतवणूकदारांसाठीचा भाग शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५ रोजी उघडून शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५ रोजीच बंद झालेला .या इश्यूसाठी बुक रनिंग लीड मॅनेजर बीलाइन कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड आहेत, आणि रजिस्ट्रार एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जात होते) आहेत.

लोकार्थ

# हेल्मेट नसल्याने पेट्रोल देण्यास नकार दिला दुचाकीस्वाराचा पेट्रोल पंप कर्मचाऱ्यावर गोळीबार

भिंड, दि. ३१ वृत्तसंस्था

मध्य प्रदेशातील भिंड जिल्ह्यात एक खळबळजनक घटना घडली आहे. हेल्मेट न घातल्यामुळे इंधन भरण्यास एका पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्याने नकार दिला. मात्र, इंधन भरण्यास नकार दिल्याने दोन दुचाकीस्वारांना राग अनावर झाला आणि त्यांनी थेट संबंधित पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यावर गोळीबार केला. या घटनेत एक कर्मचारी गंभीर जखमी झाला असून या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. ५५ वर्षीय तेज असं पीडित व्यक्तीचं नाव आहे.

हेल्मेट नसल्याने पेट्रोल देण्यास नकार दिल्याच्या कारणास्तव पेट्रोल पंप कर्मचाऱ्यावर गोळीबार करण्यात आल्याची ही घटना शनिवारी पहाटे ५ वाजता भिंड-ग्वाल्हेर राष्ट्रीय महामार्गावरील एका पेट्रोल पंपावर घडली. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीच्या हवाल्याने हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. झालं असं की दोन दुचाकीस्वार पेट्रोल भरण्यासाठी पंपावर आले होते. मात्र, त्यांनी हेल्मेट घातलं नव्हतं. त्यामुळे पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांनी पेट्रोल भरण्यास नकार दिला.


दरम्यान, पेट्रोल भरण्यास नकार दिल्याने दोन दुचाकीस्वारांनी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर संतप्त झालेल्या दोन दुचाकीस्वारांनी पिस्तूल काढली आणि गोळीबार केला. यामध्ये एक कर्मचारी गंभीर जखमी झाला. पंपावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात गोळीबाराची ही घटना कैद झाली. यामध्ये एक जण पिस्तूलने गोळीबार करत असल्याचं दिसून आलं आहे. पंपावरील कर्मचारी पळत असताना दोन्ही आरोपींनी अनेक गोळ्या झाडल्या.

# ॲमेझफिटचे दोन नवोपक्रम

ॲमेझफिट, जागतिक स्तरावर प्रशंसित स्मार्ट वेअरेबल ब्रँड, जो त्याच्या अचूकतेसाठी ओळखला जातो आणि जगभरातील खेळाडूंमध्ये विश्वासार्ह ब्रंड म्हणून ओळखला जातो,त्याने भारतात दोन अभूतपूर्व नवोपक्रम सादर केले आहेत, अमेझफिट हेलिओ स्ट्रॅप आणि अमेझफिट बॅलन्स २. एकत्रितपणे, ते फिटनेस उत्साही आणि खेळाडूंना स्मार्ट प्रशिक्षण अंतर्दृष्टी, चांगली पुनर्प्राप्ती साधने आणि सर्वोच्च कामगिरी समर्थनासह सक्षम करण्यासाठी डिझाइन केलेले एक परिसंस्था तयार करतात. ॲमेझफिटचा पहिला स्क्रीन-फ्री फिटनेस, पुनर्प्राप्ती आणि स्लीप ट्रॅकर, बहुप्रतिक्षित अमेझफिट हेलिओ स्ट्रॅप, आंतरराष्ट्रीय स्तरावर उद्योगातील सर्वात अचूक ट्रॅकर्सपैकी एक म्हणून ओळखला जातो आणि आता भारतीय ग्राहकांसाठी उपलब्ध आहे. त्यासोबतच, अमेझफिटने अमेझफिट बॅलन्स २ लाँच केले आहे, एक प्रीमियम मल्टीस्पोर्ट स्मार्टवॉच ज्यामध्ये लष्करी-ग्रेड टिकाऊपणा, १७०+ स्पोर्ट्स मोड आणि अत्याधुनिक कामगिरी देखरेख आहे. दोन्ही डिव्हाइस शक्तिशाली स्टँडअलोन वेअरेबल असले तरी, एकत्र जोडल्यावर त्यांची खरी क्षमता उलगडते. बॅलन्स २ एक व्यापक प्रशिक्षण म्हणून काम करते.

## सॅमसंग इंडियाचे नवीन मोबाइल सीटी तंत्रज्ञान

भारतातील सर्वात मोठा ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड सॅमसंगने सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स कंपनी लिमिटेडची उपकंपनी न्यूरोलॉजिका यांच्या सहकार्याने भारतात त्यांच्या पुढील पिढीच्या मोबाइल सीटी उत्पादन पोर्टफोलिओची घोषणा केली आहे. सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स कंपनी लिमिटेड प्रगत वैद्यकीय इमेजिंग तंत्रज्ञानात जागतिक आघाडीवर आहे. भारतातील निदान आणि हस्तक्षेपात्मक रेडिओलॉजीमध्ये परिवर्तन करण्यासाठी विशेषतः डिझाइन केलेले, या पुढील पिढीच्या प्रणाली गतिशीलता, एआय-संचालित कार्यक्षमता आणि रुग्ण-प्रथम डिझाइन एकत्रित करतात, शेवटी आरोग्यसेवा प्रदात्यांना



कधीही, कुठेही दर्जेदार काळजी प्रदान करण्यास सक्षम करतात. नव्याने सादर केलेल्या श्रेणीमध्ये CereTom® Elite, OmniTom® Elite, OmniTom® Elite PCD आणि BodyTom® 32/64 यांचा समावेश आहे, प्रत्येक रुग्णालये आणि विशेष केंद्रांच्या विविध क्लिनिकल गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केली आहेत. सर्व आकारांच्या रुग्णालयांमध्ये, ज्यामध्ये सेवा कमी असलेल्या प्रदेशांचा समावेश आहे, दत्तक घेण्यास सक्षम करून, सॅमसंग भारतातील प्रगत इमेजिंगची उपलब्धता लोकशाहीकरण करण्यास मदत करण्यास सज्ज आहे. भारतात मोबाइल सीटी सोल्यूशन्स लाँच करून सॅमसंग प्रगत वैद्यकीय इमेजिंग अधिक सुलभ, कार्यक्षम आणि रुग्ण-केंद्रित करण्याच्या दिशेने एक निर्णायक पाऊल उचलत आहे. हे नवोपक्रम तंत्रज्ञानाबद्दल आहेत जितके ते महानगरे आणि टियर-2/3 शहरांमधील काळजी अंतर भरून काढण्यासाठी आरोग्य सेवा प्रदात्यांना सक्षम करण्याबद्दल आहेत.

# यू मुम्बाचा पहिला हॉल ऑफ फेम सुरू

भारतातील सर्वात प्रतिष्ठित कबड्डी फ्रँचायझींपैकी एक असलेल्या यू मुम्बाने समर्पित हॉल ऑफ फेम सुरू करणारा पहिला पीकेएल संघ बनून इतिहास रचला आहे. हा उपक्रम लीग आणि फ्रँचायझीसाठी एक महत्त्वाचा क्षण आहे, कारण यू मुम्बाने त्यांच्या प्रवासाची व्याख्या करणाऱ्या खेळाडूंना औपचारिकरित्या मान्यता देण्यात एक आदर्श प्रस्थापित केला आहे. उद्घाटन संघाचे दोन महान आयकॉन आहेत, २०१५ मध्ये यू मुम्बाला पहिल्या चॅम्पियनशिपमध्ये नेणारा कर्णधार अनुप कुमार आणि कबड्डीतील सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक म्हणून ओळखले जाणारे बचावात्मक पॉवरहाऊस फजेल अत्राचली.



हॉल ऑफ फेमची सुरुवात यू मुम्बाची ओळख परिभाषित करणाऱ्या दोन व्यक्तींना, संघाला पहिल्या जेतेपदापर्यंत नेणारा कर्णधार आणि वर्चस्व आणि नेतृत्वाचे नवीन मानके स्थापित करणारा बचावपटू यांना सन्मानित करून होते. एकत्रितपणे, ते लवचिकता, उत्कृष्टता आणि निर्भयता या मूल्यांचे प्रतीक आहेत जे फ्रँचायझीला आकार देत आहेत.

"कॅप्टन कूल" म्हणून ओळखले जाणारे अनुप कुमार, यू मुम्बाच्या सुरुवातीच्या वर्चस्वामागील प्रेरक शक्ती होते, ज्याने सीझन २ मध्ये संघाला पहिले पीकेएल जेतेपद आणि सलग तीन अंतिम फेरीत नेले. त्याने फ्रँचायझीसाठी ५४६ गुण मिळवले आणि कबड्डीतील महान खेळाडूंपैकी एक म्हणून त्याचा वारसा आणखी मजबूत केला.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# मोदींनी चीनला क्लीन चिट दिली चीन दौऱ्यावरुन काँग्रेस आक्रमक

नवी दिल्ली, दि. ३१ वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या चीनच्या दौऱ्यावर आहेत. काँग्रेसने त्यांच्या या दौऱ्यावर बोचरी टीका केली आहे. 'पंतप्रधान मोदी गलवान खोऱ्यात शहीद झालेल्या सैनिकांना विसरले आणि हसत हसत चीनच्या राष्ट्राध्यक्षांशी हस्तांदोलन केले,' अशी टीका काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी केली आहे.

काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत मोदींवर कडक टीका केली. त्यांनी लिहिले की, 'आज पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात बैठक झाली. जून २०२० मध्ये गलवान खोऱ्यात चीनच्या आक्रमकतेमुळे आपल्या २० शूर सैनिकांनी आपले प्राण गमावले. तरीही, १९ जून २०२० रोजी पंतप्रधान मोदींनी चीनला क्लीन चिट दिली.' 'लष्करप्रमुखांनी लडाखमध्ये चीनच्या सीमेवर स्थिती पूर्णपणे पूर्ववत करण्याची मागणी केली होती, परंतु हे साध्य करण्यात अपयशी ठरल्यानंतरही, मोदी सरकारने चीनशी समेट घडवून आणण्यासाठी पावले उचलली, ज्यामुळे त्या भागात चीनच्या आक्रमकतेला अप्रत्यक्षपणे वैधता मिळाली.'

रमेश पुढे म्हणाले की, '४ जुलै रोजी उपसेनाप्रमुख लेफ्टनंट जनरल राहुल सिंह यांनी ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानशी चीनच्या संगनमताबद्दल जोरदार आणि स्पष्टपणे बोलले. परंतु या अशुभ युतीला कडक प्रतिसाद देण्याऐवजी, मोदींनी आज चीनचा दौरा केला.'

# ट्रम्प यांना भारतावरील आयातशुल्काचा निर्णय मागे घ्यावा लागेल-बाबा रामदेव

हरिद्वार, दि. ३१ प्रतिनिधी

अमेरिकेच्या न्यायालयानं डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयातशुल्काच्या निर्णयाला रोखलं आहे. काही दिवसांमध्येच नवीन घटनाक्रम समोर येणार आहेत. बाबा रामदेव याच्या मतानुसार डोनाल्ड ट्रम्प यांना आयातशुल्काचा निर्णय मागे घ्यावा लागणार आहे, असे मत बाबा रामदेव यांनी व्यक्त केलं.



बाबा रामदेव हे हरिद्वारमधील दत्त भगवान यांच्या मिरवणुकीत सहभागी झाले. यावेळी माध्यमांनी त्यांना डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेलं आयातशुल्क आणि मोहन भागवत यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया विचारली असता त्यांनी उत्तर दिलं.

बाबा रामेदव म्हणाले, " अमेरिकेला चीनवर लादलेलं आयातशुल्क मागे घ्यावं लागलं होतं. त्याप्रमाणंच अमेरिकेला भारतावर लादलेलं आयातशुल्क मागे घ्यावं लागेल. कारण, भारताचं मोठं सामर्थ्य आहे. भारत चीनहून कमी नाही. काही काळापासून आयातशुल्काच्या नावानं एकप्रकारे राजकीय दहशतवाद म्हणा अथवा हुकूमशाही सुरू आहे. योग्य वेळ येताच यावर उत्तर मिळणार आहे. अमेरिकेच्या उत्पादनांवर बहिष्कार, स्वदेशीवर भर देत देशाचा विकास करण्याचा संकल्प आणि संपूर्ण देशाचे हित आणि देश प्रथम ही भावनाच देशाची प्रगती करणार आहे. येत्या १० ते १५ वर्षांमध्ये संपूर्ण जगाच्या तुलनेत भारत हा सर्वात पुढे असणार आहे.

# प्रेम प्रकरणामुळे बापाने लेकीला संपवले अन् रचला आत्महत्येचा बनाव

कलबुर्गी, दि. ३१ वृत्तसंस्था

कर्नाटकच्या कलबुर्गी तालुक्यातून ऑनर किलिंगचं हैराण करणारं प्रकरण समोर आलं आहे. येथे वडील आणि नातेवाईकांनी आपल्या १८ वर्षांच्या मुलीची हत्या केली. या मुलीचं दुसऱ्या जातीतील मुलावर प्रेम होतं. स्थानिकांनी सुरुवातीला सांगितलं की, मुलीने विष खाललं, मात्र पोलिसांच्या तपासात सर्व सत्य समोर आलं.

नुकतच कविताने कलबुर्गीच्या धर्मसिंह कॉलेजमधील पीयूसीमधून शिक्षण पूर्ण केलं होतं. तिचं कुरुबा समाजातील एक रिक्षा चालक मलप्पाच्या प्रेमात होती. मात्र तिच्या कुटुंबाकडून याला विरोध होता. कुटुंबीयांनी वारंवार तिला मलप्पापासून दूर राहण्यास सांगितलं होतं. मात्र तरीही कविताला मल्लपासोबत लग्न करायचं होतं, आणि कुटुंबीयांनी परवानगी न दिल्यास तिने पळून जाण्याची धमकी दिली होती. २७ ऑगस्टच्या रात्री या मुद्द्यावरुन पुन्हा एका कविता आणि कुटुंबीयांमध्ये वाद झाला. तिचे वडील शंकर कोल्लूर, त्यांचा भाचा शरणु आणि नातेवाईक दत्तप्पा चोलाबारद यांनी घराच्या आत गळा आवळून तिची हत्या केली. आत्महत्येचा बनाव रचून या प्रकरणाला वेगळं वळण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यासाठी त्यांनी कविताच्या तोंडात कीटनाशक औषध टाकलं. दुसऱ्या दिवशी सकाळी आरोपींनी पुरावा मिटविण्यासाठी कविताचा मृतदेह चिक्का रोडजवळील शंकराच्या भावाच्या शेतात जाऊन जाळला. गावकऱ्यांनी सुरुवातीला सांगितलं की, मुलीने विषारी औषधं खाल्लं, त्यातून तिचा मृत्यू झाला. पोलिसांना संशय आल्याने त्यांची याचा तपास सुरू केला. त्यांना घटनास्थळावरुन अंशिक स्वरुपात जळालेले अवशेष सापडले आणि कटकारस्थान उघडं पडलं. यानंतर पोलिसांनी फरहताबाद स्टेशनमध्ये या बाबत गुन्हा दाखल झाला.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219